
श्री साईनाथ प्रसन्न.

# श्री साईलीला

मासिक पुस्तक.

वर्ष ६ वें ] [ अंक ४-५

नलिनीदलगत जलमतितरलम् । तद्वज्जीवनमतिशय चपलम् ।



क्षणमपि सज्जनसंगतिरेका । भवति भवार्णव तरणे नौका
शंकराचार्य.

संपादकः—रामचंद्र आत्माराम तर्खड.

# अनुक्रमणिका


स्फुट विषय

" आधुनिक पाश्चात्य शास्त्रें आणि परमेश्वराचें अस्तित्व १-१८

" भूतदया ... ... ... ... १८-२३

" अनुभव ... ... ... ... २३-२९

" अश्वत्थवृक्ष ... ... ... ... २९-३२

" अनुभव ... ... ... ... ३२-४४

अर्वाचीन श्री भक्तलीलामृत

श्री दासगणू कृत ... ... ... १-८

केकावली

" यशोदा पांडुरंगी टीकेसहित

" ले. कै. रा. व. दादोबा पांडुरंग ... ... १—१६


## विनंति.

सुप्रसिद्ध श्री मोरोपंत कविकृत **केकावली** या भक्तिरसप्रेमामृतांत ओथंबलेल्या काव्यावर कै. रा. ब. दादोबा पांडुरंग यांची "यशोदा पांडुरंगी" ही टीका या अंकापासून क्रमशः प्रसिद्ध करण्यांत येत आहे.

ही टीका सुमारें साठ वर्षांपूर्वी प्रसिद्ध झालेली होती, आणि आज मितीस हा ग्रंथ अत्यंत दुर्मिळ झाला आहे. तरी ग्राहक याचा फायदा घेऊन ऋणी करतील अशी आशा आहे.

व्यवस्थापक—**श्रीसाईलीला**

## श्री साईभक्तांस विज्ञप्ति.

कोणाला श्री साईमहाराजांबद्दलचे त्यांचे स्वतःचे अनुभव श्री साईलीलेंत प्रसिद्ध व्हावे म्हणून पाठविण्याचे असतील त्यांनीं ते आमचेकडे पाठविल्यास ते प्रसिद्ध होण्याबद्दल आदरपूर्वक योग्य तो विचार होईल.

**रा. आ. तर्खड**

—प्रकाशक

# आधुनिक पाश्चात्य शास्त्रें

आणि

# परमेश्वराचें अस्तित्व.

पाश्चात्य संस्कृतीच्या आघातानें आपले आचार व विचार झपाट्यानें बदलत चालले आहेत आणि त्यामुळें सध्यांच्या तरुण स्त्रीपुरुषांच्या मनावर जुन्या धर्ममतांविषयीं अनादर उत्पन्न झाला आहे ही गोष्ट निर्विवाद आहे.

ईश्वराचें अस्तित्व त्यांना बहुतांशीं कबूल नाहीं. मूर्तिपूजाही बिलकुल संमत नाहीं. पुढील जन्म वगैरे सब झूट. ह्या सर्व विचारांमुळें आपली अवनति झाली अशी त्यांची ठाम समजूत झालेली आहे. आणि असें त्यांना वाटणें साहजिक आहे.

दोन आणि दोन म्हणजे चार ह्याप्रमाणें ईश्वराचें अस्तित्व तुम्ही सिद्ध करून द्याल तरच आम्ही ईश्वर आहे असें मानूं असें त्यांचें म्हणणें आहे.

माळसर या नांवाचें श्री नर्मदेच्या कांठीं एक लहान खेडें आहे. तेथें एक सत्पुरुष राहात असत. त्यांचें नांव श्री माधवदासजी. हे एक उंच, भव्य व तेजस्वी पुरुष होते. जसे दक्षिणेस श्री साईबाबा त्याप्रमाणें हे गुजराथचे साईबाबा म्हणून प्रसिद्ध होते. श्रीमंत गायकवाड सरकारच्या कुटुंबांतील व त्यांच्या राज्यांतील सरदार, दरकदार, लहानथोर अंमलदार व आजूबाजूच्या हजारों लोकांनीं त्यांचें दर्शन व आशीर्वाद घेतले आहेत हे सत्पुरुष थोड्या वर्षांपूर्वी समाधिस्त झाले. त्यांच्याच तोंडून ऐकलेली खालीं लिहिलेली गोष्ट देत आहें.

ह्या योगी पुरुषाची भेट घेण्याला एक नामांकित ग्रॅज्युएट एके दिवशीं गेला. ह्या गृहस्थाचें नांव महाराजांच्या सर्व अनुयायांस ठाऊक आहे. ह्या गृहस्थानें सायन्समध्यें अत्यंत प्रविणता मिळवून आपल्या अक्कलहुषारीनें लाखों रुपये मिळविले, आणि ते पुढें उतार वयांत कांहीं सद्व्यांत घालविले. त्याचा परिणाम त्याच्या मनावर इतका झाला, आणि त्याचें डोकें इतकें

भयंकर रीतीनें ठणकूं लागलें कीं, तें दुःख त्याच्यानें मुळींच सहन करवेना. मुंबईच्या व इतर मोठमोठ्या प्रसिद्ध डॉक्टर व वैद्यांच्या उपचारांनीं त्याला बिलकुल आराम वाटेना. ह्याप्रमाणें कांहीं वर्षें गेलीं. तो वेडापिसा झाला. स्वतःच्या जीविताला अगदीं कंटाळून गेला. तेव्हां महाराजांच्या कोणी अनुयायानें त्याला महाराजांची भेट घेण्यास सांगितलें. आणि त्याप्रमाणें तो जीवाला कंटाळलेला गृहस्थ एके दिवशीं महाराजांच्या भेटीसाठीं माळसर मुक्कामीं गेला.

महाराजांची भेट घेतांना तो इसम म्हणाला, " देखो मैं आपके पास आया हूं क्यौं के आपके पास कुछभी जडी बुट्टी होगी ओ लेकर मेरेकूं आराम होगा. "

महाराज म्हणाले " अरं मेरे पास तो जडी बुट्टी कुछभी नहीं. मै तो श्री भगवानजीका एक गरीब याचक हूं. तुम मंदिरमें जाओ और दर्शन लेओ. श्री भगवानजीकी मर्जी होगी तो तुमकू जरूर आराम होगा. "

त्यावरून ह्या इसमाची मर्जी गेली. तो म्हणाला, " महाराज माफ करो. मैं मूर्तिके पग पर मेरा सीर कभीभी नहीं नमाऊंगा. क्यौं के ए एक पथ्थर है. और तुम्हेरा भगवान बिगवान मै कुछभी नहीं मानता. क्यौंके हमारा सायन्स मूजब भगवान ए सब झूट बात है. मैं जैसी ए मेरे हातकी अंगुली मेरे आंखोंसे देखता हूं वैसी रीतसे जो तुम तुम्हेरा भगवान मेरेकू बताओंगे तो मैं ए सच मानूंगा. " महाराज कांहीं बोलले नाहीं. त्या रात्रीं त्याला गाढ झोंप लागली. अशी झोंप आज कित्येक वर्षें त्याला आली नव्हती. दुसऱ्या दिवशीं सकाळीं उठल्यावर त्याला फारच हुषारी वाटली. डोकें दुखावयाचें साफ राहिलें. तो आनंदानें महाराजांपाशीं आला आणि म्हणाला, " महाराज यहांका हवापाणी बहोत अच्छा है. मेरेकू बहोत आराम है. "

महाराज म्हणाले, " श्री हरीकी कृपा. " हे शब्द ऐकतांक्षणीं ह्या गड्याची मिजास गेली. तो रागावून म्हणाला, "महाराज, ए हरी बिरी कुछ

मत बोलो. ए बात तो सब झूठ है." महाराज स्तब्ध राहिले. दोनप्रहरी जेवण झाल्यावर ह्या गृहस्थानें थोडा वेळ वामकुक्षी केली. आणि नंतर त्याचें डोकें असें भयंकर दुखावयास लागलें कीं, कांहीं विचारूं नये. तो तसाच रडत महाराजापाशीं आला व आपलें डोकें फार दुखतें असें म्हणाला. महाराज म्हणाले "अच्छा." फारच काकुळतीस येऊन आपल्या डोकें दुखीचें त्यानें गाऱ्हाणें मांडलें. महाराजांचा एकच शब्द, "अच्छा." सरते शेवटीं हा गृहस्थ रागावून म्हणतो "महाराज, मैं आपके पास फिर्याद कबसे करताहूं के मेरा सीर बहोत बहोत दुखता है के जैसा अभी फट जावे, और आप मेरेकूं अच्छा अच्छा कहेता हो ए क्या?"

महाराज म्हणाले "तेरा सीर दुखता है ऐसा तूं कहेता है."

"हां, महाराज बहोत बहोत दुखता है." महाराज त्याला म्हणाले, "मैं नहीं देखता तेरा सीर कैसा दुखता है. जैसी मैं मेरी हातकी ए अंगुली देखताहूं तैसे तूं तेरा सीर कैसा दुखता है ए मेरेकु बताओ, तो मैं सच मानुंगा."

तो म्हणाला "ए मैं कैसा बतावूं?" "तेरे सीरमें क्या चलता है ए तूं पोने बताने नहीं सकता, और प्रभुजीकूं तेरे हातके अंगुली माफक बतानेकू मेरेकू कहेता ए कैसा होगा?" गृहस्थ जबाब देतो कसला! असो. संतच ते, त्यांचें मन कळवळलें. त्याला दहा पंधरा दिवस ठेवून घेतलें. त्यांच्या सान्निध्यानें त्याला बरें वाटलें. पण त्याला सत्पुरुषाची कृपा ही काय ह्याची किंमत कळली नाहीं.

श्री साईबाबांच्या पायांजवळ बसून त्यांना आमच्यासाठीं शारीरिक व मानसिक कष्ट देऊन आम्ही तरी काय केलें व करीत आहोंत, याचा ज्यानें त्यानें आपल्यापाशीं सूक्ष्म विचार करावा.

सारांश हा कीं, आधुनिक पाश्चात्य शास्त्रांच्या अध्ययनानें अणि त्याच्या बाह्यात्कारी झकाकीनें आमचे डोळे दिपून जाऊन आमची सूक्ष्म विचार करण्याची सरणी बरीच क्षीण झालेली आहे.

वरील गोष्ट सुमारें दहाबारा वर्षांपूर्वी घडली. त्यानंतर दरोज गोंधळ माजला आहे.

अर्वाचीन पाश्चात्य शास्त्रें खोटीं नाहींत. केमिस्ट्री, फिझीक, फिलिआलॅाजी, अनॅाटमी, सायकोथेरापी, जीआलोजी, मिनरालोजी, बाटनी, वगैरे सर्व शास्त्रांचा थोडाफार अभ्यास करून, त्यांतील मर्में व्यवहारांत उपयोगी पडतील असें ज्ञान प्राप्त करून न घेतल्यास आपण दिवसेंदिवस फारच झपाट्यानें मागें पडूं. इतर राष्ट्रें आपल्या पुढें जाऊन आपण फक्त (Human sheep Breeding farm) म्हणजे मनुष्यरूपी मेंढरें उत्पन्न करण्याचा कोंडवाडा राहूं ह्यांत कांहीं संशय नाहीं.

एक लहानशी वस्तु. खिशांतील आगकाडयांची पेटी. एक काडी ओढली कीं, ताबडतोब अग्नि प्रकट होतो. अग्निनारायणाची जोपासना किती तरी काळजीपूर्वक करावी व ठेवावी लागत असे, हें ऐशी वर्षांपूर्वीच्या लोकांकडून प्रत्यक्ष ऐकलेलें लेखकाला ठाऊक आहे. ह्या एक क्षुल्लक दिसणाऱ्या शोधामुळें पाश्चात्यांचें भौतिक शास्त्रांतल्या सुधारणेंचें पाऊल फारच झपाट्यानें पुढें पडलें. रसायनशास्त्रांतले पुढील आश्चर्यकारक शोध एकामागून एक त्यामुळें समजले. ते त्यांनीं व्यवहारी उपयोगांत आणले. त्यानंतर वाफ कबजांत आली. आणि इलेक्ट्रिसिटी व मॅागनेटिझम ह्या विद्या आणि त्यांच्यापासून निर्माण झालेल्या कलांना प्रोत्साहन मिळालें. हें सर्व ज्या वेळीं प्रथमतः घडून आलें त्या वेळीं पाश्चात्य लोकांचे निरनिराळे देश आपल्याप्रमाणेंच आपापसांत लढाया करण्यांत गुंतलेले होते.

असें जर आहे तर ईश्वरविषयक गोष्टींपासून फायदा काय? ह्या "मतामतांच्या गलबल्या" मुळें आपल्या देशाचें अतोनात नुकसान झालेलें नाहीं काय? होय, अशा कांहीं क्षुल्लक सामाजिक आणि व्यवहारिक गोष्टी आपल्यामध्यें घुसून आल्या कीं, त्यामुळें आपल्या अवनतीला व पडतीला प्रचंड गति मिळाली. तरीपण आपल्यामध्यें असलेल्या ईश्वराच्या अस्तित्वाच्या हजारों वर्षांच्या संस्काराचा विचारपूर्वक आधार घेऊन, आणि त्यामुळें

अभी होऊन पाश्चात्य शास्त्रांच्या आधारानें आपली उन्नति होऊन आपण पुढें जाऊं ह्याविषयीं संशय वाटत नाहीं.

आतां आपण आधुनिक पाश्चात्य शास्त्रांच्या आधारानें विचार करूं. केमिकल एनर्जी–रसायन शास्त्र–पृथ्वीपासून, हीट–उष्णता, लाईट–उजेड–ही वायु व तेजापासून, इलेक्ट्रिसिटी व म्यागनेटिझम--ही ईश्वर अथवा आकाश ह्या महाभूतापासून. लाईफ एनर्जी म्हणजे सर्व प्राणिमात्र आणि वनस्पती निर्माण होणें अशी जीवनशक्ति.

ह्या सर्व शक्तींचा पाश्चात्य लोक अट्टाहासानें अभ्यास करीत आहेत आणि आपणाला तो केलाच पाहिजे. ह्यांचा व इतर दुसऱ्या शक्तींचा ते कास्मिक एनर्जी ह्या प्रचंड शक्तीमध्यें समावेश करितात. आणि तें बरोबर आहे.

ही कास्मिक एनर्जी म्हणजे सर्व ब्रह्मांडाच्या अंतर्गत असलेली प्रचंड, अवर्णनीय, अतुल, अगाध, असीम, अनंत, व अनादि आहे असें ते कबूल करतात. ह्या शक्तीपासून आणि जी अदृश आहे. **तिच्यापासून दृश्य आणि अदृश्य ब्रह्मांड उत्पन्न होऊन** तें तिच्यांतच लीन होतें.

विजेचें बटण दाबलें म्हणजे तत्क्षणीं सर्व घरांतले विजेचे दिवे पेटून कोनाकोपऱ्यांत प्रकाश पडतो. हा आपण त्या इलेक्ट्रिक शक्तीच्या प्रभावाचा परिणाम पाहातों. कधीं कधीं झटका बसतो, समजतो; पण ही इलेक्ट्रिक शक्ति काय आहे हें कळत नाहीं. म्यागनेटिझम–परिणाम कळतो. काय शक्ति आहे ठाऊक नाहीं. उष्णता–परिणाम कळता. काय शक्ति आहे ठाऊक नाहीं. गुरुत्वाकर्षण–परिणाम कळतो. काय आहे ठाऊक नाहीं.

लाईफ एनर्जी–वनस्पति प्राणिमात्र उत्पन्न होणें--परिणामानें कळतें--काय आहे कळत नाहीं.

आतां ही कास्मिक एनर्जी आहे हें पाश्चिमात्य विद्वान कबूल करतात म्हणून आम्ही ही कबूल करितों. पण आपल्या पूर्वजांनीं हजारों वर्षांपूर्वी

ही कास्मिक एनर्जी जाणली आणि तिचा अनुभव देखील घेतला हें आपण सध्यां विसरलों आहोंत. ही जी पाश्चात्य शास्त्र्यांची कास्मिक एनर्जी, जिचे **परिणाम** आपण एका अत्यंत सूक्ष्म परमाणूपासून अखिल ब्रह्मांडापर्यंत पाहातों तिलाच आपण परमेश्वराची चित्शक्ति असें मानतों.

येथें इतकें नमूद केलें पाहिजे कीं, आपलीं वेदांतशास्त्रें परमेश्वराचें अस्तित्व ह्या कास्मिक एनर्जीच्या फार पलीकडे नेतात. ही त्यांची विचार-सरणी फारच सूक्ष्म आणि खरी आहे; तरीपण ज्या अर्थीं आपणाला आधुनिक पाश्चात्य शास्त्रें शिकणारांच्या विचाराप्रमाणें त्यांना जिथवर जाववेल तिथवर जाणें आहे त्या अर्थी ह्या अगम्य कास्मिक एनर्जीलाच परमेश्वराची चित्शक्ति म्हणणें ठीक होईल आणि तें त्यांना समजेलही.

ह्या पाश्चात्यांच्या कास्मिक एनर्जी अथवा आपल्या परमेश्वराच्या **चित्शक्तीपासून निर्माण होणारीं** अनंत कोटि ब्रह्मांडें, अनंत कोटि सूर्य चंद्र, तारे, पंचमहाभूतें व त्यांचे खेळ, आपल्या सृष्टीवरील आपणासहित सर्व रचना जीं सर्व आपल्या ज्ञानेंद्रियांस प्रत्यक्ष दिसतात व कळतात, जिला आपण इंग्रजींत नेचर अथवा निसर्ग म्हणतों, तीच ह्या चित्शक्तीची अथवा परम पुरुषाची लीला. तीच त्याची माया.

माया कां, कीं ईश्वराची पूर्ण शक्ति तिच्यांत सदोदित परिपूर्ण आहे तरी पण ती सदोदित बदलणारी व तिचीं रूपें नाशिवंत आहेत. तिला कायमचें एक रूप नाहीं.

प्रत्येक झाड, पान, परिमाणू हीं परमेश्वराच्या मायेचें दृश्य स्वरूप त्या सर्वांच्या आंत जें त्याचें गूढ व अगम्य अस्तित्व तेंच त्याचें शुद्ध, बुद्ध नित्य स्वरूप. हें त्याचें खरें स्वरूप जाणण्याला त्याच्या मायेच्याच म्हणजे नेचर अथवा निसर्गाच्या आधारानें जावें लागतें. हें ज्ञान आपल्या पूर्वजांनी आपणांला हजारों वर्षांपूर्वी दिलेलें आहे. आणि हा आपला एक अमोलिक ठेवा आहे.

आतां सवाल उभा राहातो कीं, आम्हाला कास्मिक एनर्जी वगैरे सर्व समजतें--( उमजतें काय ? ) पण तिला चित्शक्ति असें मानून पूजाअर्चा करण्यांत व्यर्थ वेळ घालविण्यांत अर्थ काय ?

ही विचारसरणि वरपांगी पाहाणाराला योग्य वाटेल व तो त्यामुळें खाणेंपिणें, मजा करणें यापलीकडे साहजिक लक्ष देणार नाहीं.

ही कास्मिक एनर्जी अथवा चित्शक्ति आपणां सर्वांमध्यें आहे. असें उपनिषदें आज हजारों वर्षें टाहो फोडून सांगत आहेत. श्रीकृष्ण भगवानांनीं यासाठींच गीता गायिली. आपण प्रत्येक कोण आहोंत याची जाणीव दिली. अभ्यास करा, अभ्यास करा म्हणून कंठरवानें सांगितलें. पाठीमागें, पुढें, सर्व बाजूनीं आणि तुमच्या हृदयांत प्रभु आहे असा अनुभव येतो म्हणून सर्व साधुसंत मुक्तकंठानें सांगत आले आहेत. असें असतां निव्वळ भाकडकथा म्हणून उडविणें, शोध करावयाचा नाहीं, आपणांमध्यें एवढी प्रचंड शक्ति असून, श्री सांईबाबासारखे मार्गदर्शक असून आपण सूक्ष्म विचार कां करूं नये ?

निसर्गाचीं रम्य स्थळें पाहून अंतःकरण साहजिक रीतीनें प्रफुल्लित होतें, व तो देखावा पाहातांना त्याच्या अंतर्गत असलेल्या परमप्रिय मंगलकारक प्रभूची स्मृति होऊन आपणांला आदरपूर्वक त्या प्रभूला फूल नाहीं तर फुलाची पांकळी कृतज्ञतापूर्वक अर्पण करण्यास सवड मिळावी म्हणून या आपल्या मायभूमींत जागोजागीं असंख्य लहानथोर देवालयें भाविक भक्तांनीं बांधलेलीं आहेत. ज्याच्या त्याच्या मनाच्या भूमिकेप्रमाणें परमेश्वराचीं रूपकें कल्पून त्या त्या प्रमाणें तशा मूर्ति त्या देवालयांत स्थापन केलेल्या आहेत. येथें एवढें खास ध्यानांत आणावयाचें कीं, त्या त्या मूर्तीमध्यें परमेश्वराच्या अस्तित्वाचें प्रेमपूर्वक आव्हान करून नंतरच भक्त तिची पूजा अथवा सेवा करीत असतो.

निराकार प्रभूची भक्ति करतांना भक्त त्याचें सगुण रूप स्मरून आपलें गाऱ्हाणें अथवा मागणें अथवा प्रार्थना करीत असतो. दोन्ही प्रका-

रख्या भक्तांचा हेतु एकच, सेवा एकच. फरक काय तो ज्याच्या त्याच्या अंतिम निस्सीम प्रेमामध्यें. श्री विठोबाची सप्रेम भक्ति करूनच श्रीतुकाराम महाराज एवढया अधिकाराला पोहोंचले हें विसरतां कामा नये.

लेखकाच्या एका परमप्रिय मित्राची बायको, सून व मुलगा सुमारें सहासात वर्षांमागें कार्तिकी एकादशीला पंढरपुरीं श्री विठोबाच्या दर्शनासाठीं गेले. गर्दी मनस्वी होती. मित्राच्या बायकोचें वय सुमारें ५७।८, शरीराकृति ठेंगणी, पण चालणेंबोलणें व दृष्टि तरतरीत. मुलगा पुढें, मध्ये त्याची आई आणि तिच्या मागें सून याप्रमाणें देवाच्या गाभाऱ्यांत ही मंडळी दर्शनासाठीं अत्यंत उत्सुकतेनें शिरली.

मुलानें श्री पांडुरंगाच्या पायांवर डोकें ठेवून तो पुढें झाला. त्याच्या नंतर त्याच्या आईनें देवाच्या पायांवर डोकें ठेवलें, तेव्हां तिला देवाचे पाय मऊ व गरम लागले तिला अतिशय आनंद झाला. आणि तेथेंच मुलाला मोठ्यानें हांक मारून बोलली "अरे देवाचे पाय कसे मऊ व गरम गरम आहेत!" मुलाला हा अनुभव आलेलाच होता. तो म्हणाला " होय. " नंतर सुनेलाही तोच अनुभव आला. तिघांना अत्यंत आनंद झाला.मुंबईस आल्यावर मला ही हकीकत माझ्या मित्राकडून कळली. हा त्यांचा अनुभव खरा नाहीं असें मला वाटण्याला कांहीं कारण नाहीं. एक तर त्यांची आनंदपूर्ण मुद्रा खरेपणाची साक्ष देत होती; दुसरें भाव तसा देव ही खरी वस्तुस्थिति आहे.

आतां हें कसें म्हणून आधुनिक विद्वान म्हणतील, आणि त्यांना तसें वाटणें साहजिक आहे.

पाहा परमेश्वराच्या शोधनामागें वर्षांनुवर्षें घालवून कोठेंही थांग लागत नाहीं तेव्हां ब्रह्मवेत्ते " उलट उलट फिर माघारा प्राण्या कां गोते खासी " म्हणतात. हें उलट फिरणें म्हणजे काय व कसें साधावयाचें! बाह्य सृष्टींत परमेश्वराला धुंडून तो न मिळाल्यामुळें आपल्या शरीरांत दृष्टि वळवावी लागते. ही अंतर्दृष्टि करतांना साधारण माणसाला फार जपावें लागतें.

आणि त्यासाठीं ब्रह्मवेत्त्या गुरूची कृपा अथवा त्यांच्या जीवंत वचनांवर निखालस श्रद्धा ह्याची अवश्यकता लागते.शमदमादि साधनांबरोबर प्राणायाम,ध्यान धारणा यांची आवश्यकता आहे.ह्यावर असा आक्षेप घेण्यांत येइल कीं, ह्या सर्वांपेक्षां भक्तिमार्ग फारच सोपें साधन असून हा बिकट मार्ग कशाला ? अहो, पण आम्ही पाश्चात्य शिक्षणाप्रमाणें तयार झालों आहोंत, कास्मिक एनर्जी वगैरे आम्हांला कळतें; पण देव वगैरे सर्व काल्पनिक गोष्टी असून त्यामुळें त्याची आम्ही भक्ति करणार नाहीं. ह्या मुद्यावर तर हा लेख आहे. देव म्हणून म्हणतात तो आम्हाला कळला पाहिजे म्हणूनच प्राणायामादि साधनांचा उपयोग करून आपल्या आंत त्याला शोधावयाचें आहे.

सुमारें १९१२ सालची माझ्या एका परमप्रिय मित्राची गोष्ट. ह्या गड्याला सन १९१०सालीं श्री सांईबाबांचें दर्शन झालें. पण बाबांच्या लीला याच्या आकलनांत मुळींच येईनात.तेव्हां त्यानें संतांचे मराठी ग्रंथ,श्री विवेकानंदांचीं व रामतीर्थांचीं पुस्तकें वाचण्याचा सपाटा चालविला.त्याला श्री विवेकानंदांचें राजयोग पुस्तक फारच अवडलें. स्वतः फिझिऑलॉजी व कंपाराटिव्ह अनॉटमीचा फारच सूक्ष्म रीतीनें अभ्यास केलेला असल्यामुळें हे सर्व राजयोगाचे खेळ आपल्या शरीरांत असलेल्या व्हेझोमोटर नर्व्हवर ताबा आणल्यामुळें होतात अशी त्याची पूर्ण खात्री झाली.प्राणायाम हा ईश्वरप्राप्तीसाठींच करावयाचा, सिद्धीसाठीं नव्हे अशा दृढ निश्चयानें त्यानें ह्या विद्येचा अभ्यास हळू हळू सुरू केला. थोड्याच अवधींत त्याला हुशार वाटूं लागलें. तबियत सुधारली. शरीरांत एक प्रकारचा नवा जोम आणि उत्साह आला. त्या सालचा सेप्टेंबर महिना. तारीख सुमारें १२ ची असेल. हा गृहस्थ सायंकाळीं सुमारें सात वाजतां घरीं आला. गार पाण्यानें स्नान करून प्राणायाम करण्यासाठीं बसला,दृष्टि नासिकाग्र. थोड्या वेळानें त्याला नजरे पुढें गुलाबी रंगाचा प्रकाश दिसला, तो कांहीं केल्या जाईना, स्वारी आसन सोडून उठली. गार पाण्यानें तोंड धुवून पुन्हा आसन ठोकलें. पुन्हा तोच प्रकार. पुन्हा उठून तोंड धुवून आसन घातलें. पुन्हा तोच प्रकार. मात्र ह्यावेळेस लाल भडक

उजेड डोळ्यांपुढें होता, तो कांहीं केल्या जाईना. देवा हा काय प्रकार आहे असें बोलून त्या उजेडाकडे दृष्टि लावली. तेव्हां त्याला एका घराला आग लागलेली दिसली. हें घर कोणतें हा विचार मनांत येतांच ज्या कारखान्याशीं माझ्या मित्राचा संबंध होता त्या कारखान्याच्या अमूक एका भागाला भयंकर आग लागली आहे असें त्याला स्पष्ट दिसलें. तें पाहातां क्षणीं, तात्काळ आसन सोडून, डोळ्यांत आसवें येऊन, अंतर्यामिन् प्रभूला त्यानें साष्टांग नमस्कार घातला आणि म्हणाला "देवा, तुझ्या प्राप्तीसाठीं मी प्राणायाम सुरू केला, या सिद्धीसाठीं नव्हे, सबब आजपासून प्राणायाम बंद." असें बोलून खोलीच्या बाहेर आला, आणि आम्हां सर्वांना ही हकीकत सांगितली. त्यानंतर जेवणें नुकतींच संपत आहेत, अशा वेळीं त्या कारखान्याचा एक शिपाई आला आणि त्यानें वर्दी दिली " साहब बडी अंगार लगी है. " त्याला माझा मित्र जबाब देतो " हमकू मालूम है. " तो ताबडतोब कारखान्यावर गेला. आग कबजांत येऊन विझावयास लागली होती. मध्यरात्रीनंतर सुमारें एक वाजतां घरीं परत आला.

ह्या गोष्टीचा पुढील प्रकार आणखी गंमतीचा घडला. वरील हकीकत घडल्यानंतर सुमारें दोनतीन महिन्यांनीं आम्ही सर्व मंडळी शिर्डीला श्री साईबाबांच्या दर्शनासाठीं गेलों. आमच्याबरोबर माझा मित्र आणि त्याची बायको होती. श्रींच्या पायांवर डोकें ठेवतां क्षणींच श्री त्याला म्हणाले, " काय रे रांड चिटकायला पाहात होती ? अरे मी कशी चिटकूं देईन ! आपल्याला अशा रांडांबरोबर कांहीं करावयाचें नाहीं. " हें ऐकून मित्र मनांत खूप खुप झाला. पण बापड्या बायकोला तें कांहीं समजेना. तिचा तिच्या नवऱ्यावर पूर्ण विश्वास होता. तथापि बायकोच ती. श्रींच्या तोंडून हे शब्द ऐकतांच तिची मुद्रा केंविलवाणी झाली. तिच्या नवऱ्यानें तिच्या जवळ उलगडा करावयाचा यत्न केला; तरी श्रींच्या तोंडून ऐकेपर्यंत तिच्या मनाचें समाधान झालें नाहीं.

माझ्या मित्रानें जरी आसन मांडून प्राणायाम करावयाचें सोडलें, तरी प्राणायामानें त्याला सोडलें नाहीं. व पुढें त्याला श्री सांईबाबांच्या कृपेनें ह्यासंबंधानें अमोलिक फायदा झाला.

असो. एवढया विस्तारानें ही हकीकत सांगावयाचें प्रयोजन हें कीं, आपणांसर्वांमध्यें ही अफाट व अतर्क्य शक्ति, ईश्वरीसामर्थ्य, पूर्णपणें वसत आहे. होच जगन्माता, श्री सरस्वती, श्री महालक्ष्मी, श्री दुर्गा, श्री भवानी आपलें पालनपोषण करणारी, आपल्याला अन्नवस्त्र पुरविणारी अन्नपूर्णा रूपी आपली श्री हिंददेवी श्री हिंदमाता हीच, याचा अनुभव घेणें हें सर्वस्वीं ज्याच्या त्याच्या इच्छेवर आहे.

श्री शिवाजी महाराजांना श्री भवानी प्रसन्न होती आणि ती त्यांना वेळो वेळीं योग्य तो इषारा देत असे ही भाकड कथा नाहीं. त्याच दैवी इषाऱ्यावर भिस्त ठेवून महाराजांनीं अलौकिक धाडसाचीं कृत्यें स्वतःच्या हातांनीं केलीं. ह्याच दैवी कृपेमुळें आजमितीस हिंदु हयात आहेत. " संभवमि युगे युगे " याचा प्रत्यक्ष पुरावा म्हणजे श्रीभवानी देवीनें श्रीशिवाजी महाराजांच्या हृदयांत स्फूर्ति देणें. जनतेनें त्यामुळें श्रीशिवाजी-महाराजांना श्रीशिवदेवाचा अवतार मानला व अद्यापि मानत आहेत ह्यांत आश्चर्य तें कोणतें ? " परित्राणाय साधूनां विनाशाय च दुष्कृतां, धर्म-संस्थापनार्थाय, " ही कृति त्यांच्या हातून झाली नाहीं काय ? येथें एवढें खास लक्षांत ठेवलें पाहिजे कीं, मी श्री शिवाचा अवतार आहें असें श्रीशिवाजी महाराजांनीं स्वतःसंबंधानें अवडंबर, ढोंगी वृत्तीनें माजवून जनतेला फसवून आडमार्गानें नेण्याचा कधींही यत्न केला नाहीं. असें जर ते करते, तर ते खास फसले गेले असते. हृदयस्थ देवाला, ठकविण्याचें बर्तन, कधींही बसत नाहीं. आणि जो जो साधुपणाचा आव आणून स्वतःसंबंधानें जनतेला फसविण्याचा यत्न करतो, तो स्वतःस फसवून आपल्या हृदयांतलें ईश्वरी सामर्थ्य घालवीत असतो.

विचार करा, सूक्ष्म विचार करा, ह्या श्री शिवाजीमहाराजरूपी एका व्यक्तीच्या हृदयांत श्री भवानी देवीनें स्फूर्ति देऊन त्यामुळें ह्या अलौकिक पुरुषाकरवीं आपलें केवढें कोट कल्याण केलेलें आहे !

ज्यांनीं ज्यांनीं फिझिऑलॉजी आणि अनॉटमी ह्या शास्त्रांचा सूक्ष्म अभ्यास केला आहे त्यांना प्राणायाम मुळींच कष्टसाध्य नाहीं. त्याच्यापासून दुष्परिणाम होणें शक्य नाहीं. पाहा, सध्यां क्युईझम, आटोसजेशन ह्या साध्या गोष्टींवर जनतेचा विश्वास पटत चालला आहे. डीप ब्रीदिंग ( दीर्घ श्वास घेणें ) ही अत्यंत उपयुक्त गोष्ट आहे असें सर्व डॉक्टर लोक जोर देऊन सांगतात. आणि हे अभ्यास तर केवळ खालच्या पायरीच्या गोष्टी आहेत तर क्रमाक्रमानें वेळ साधून नियमितपणानें अभ्यास केले असतां, आपल्या शरीरांतल्या ह्या अतर्क्य सामर्थ्याचा दोरा हस्तगत होतो. ज्याला ज्याला आपल्या आंत असलेल्या ह्या ईश्वरी सामर्थ्यांचा अनुभव घेणें असेल त्यानें जरूर यत्न करून पाहावा म्हणजे त्याला संत वाक्याची खात्री होईल कीं, " जो नर करणी करे, नर का नारायण होजाय. "

सध्यांच्या अभ्यास क्रमांत ज्याप्रमाणें फिझिऑलॉजीच्या अभ्यासाची आवश्यकता आहे, त्याप्रमाणें त्या विषयावर लक्ष देण्यांत येत नाहीं. खगोलभूगोलाची बारीक सारीक माहिती होऊन देखील आपल्या स्वतःच्या शरीरांत काय काय चाललें आहे ह्याविषयीं अज्ञान आहे, तर त्या एकांगी शिक्षणाचा उपयोग काय ?

जुन्या पद्धतीप्रमाणें प्राणायामाची उपयुक्तता संध्येंत शिकवलेली आहे. आतां संध्या करणें व त्यांत प्राणायामाचा तर निवळ फार्स झालेला आहे. ह्याप्रमाणें अशा उपयुक्त साधनांची हेळसांड होऊन जर आपण मनानें आणि शरीरानें हीनदीन होऊन बसलों तर त्यांत चूक कोणाची !

आपण भूमिती शिकतांना काल्पनिक बिंदू जाणूनबुजून गृहीत धरून त्याच्या निवाळ भ्रामिक स्थापनेवर त्या शास्त्राचें अध्ययन करितों.

ईथर ही काल्पनिक वस्तु आहे असें मानल्याशिवाय पाश्चात्यांना रेडिओ वगैरे शास्त्रांचा उलगडा करतां येत नाहीं. आपण आकाश या तत्त्वांत रेडिओ वगैरे शास्त्रांचा तात्काळ समावेश करतों. ईथर हें तत्त्व जें पाश्चात्यांना काल्पनिक तें आम्हाला समजण्याला मुळींच अडचण पडत नाहीं. याप्रमाणें वरील शास्त्रांतले सिद्धांत आम्ही मानतों आणि ईश्वराच्या अस्तित्वाविषयीं मात्र नाकें मुरडतों, ही कोणत्या प्रकारची विचारसरणि !

परमेश्वराचें अस्तित्व खऱ्या अंत:करणानें जे मानतात, ध त्याची नामरूपानें आठवण करतात, त्यांच्या हृदयांत त्यांच्या त्यांच्या भूमिकेप्रमाणें व अभ्यासाप्रमाणें उत्तरोत्तर विकास होऊन, त्यांचीं मनें प्रफुल्लित होऊन, त्यांचा अंतार्यामिन् प्रभू त्यांच्या प्रेमाला भुलून, त्यांचा आयुष्यक्रम सुखावह करितो. त्यांच्या तोंडावर साहजिक आनंदाची झुळूक दिसूं लागते ही मुख्य खूण. पाहिजे तसा प्रसंग येवो, त्यांची भिस्त त्यांच्या अंतर्यामिन् प्रभूवर सर्वस्वी असल्याकारणानें तो त्यांना त्यांतून मार्ग दाखवितो. प्रसंग विशेषीं देह जरी प्रभूप्रीत्यर्थ सोडावा लागला तरी ते यत्किंचित डगमगत नाहींत. अशा लहानथोर संतांचीं चरित्रें अजरामर झालीं आहेत. त्यांतील कित्येक आज हजारों वर्षे जगाला आदर्शवत् झालेले आहेत. त्यांचीं वचनें व लेख प्रेमपूर्वक वाचून, मनन, व स्तवन करून त्यांचे खरेखुरे अनुयायी ब्रह्मानंदाचा लाभ घेत आहेत. हा ब्रह्मानंद संतांच्याच पायांपाशीं बसून अथवा त्यांच्या वचनानीं मन तल्लीन होऊन मनुष्याला अनुभवितां येतो.

ज्यांनीं ज्यांनीं डॉ. रामकृष्ण भांडारकरासारख्या विद्वान् गृहस्थाला, न शिकलेल्यासवरलेल्या, पण श्री विठोबाच्या ठायीं अचल श्रद्धा व प्रेम असलेल्या व त्यामुळें तल्लीन अशा श्रीतुकाराम महाराजांच्या अभंगरूपी वचनांचा हृदयांत पूर्ण अनुभव घेऊन गात असतांना सर्व अंगावर रोमांच उभे, कंठ सद्गदित, डोळ्यांतून अश्रूंचे पूर वाहत आहेत, अशा स्थितींत

पाहिलेले आहे, त्यांना त्यांना या भक्तिमार्गांत कांहीं तरी विशेष आहे असें साहाजिक वाटून, त्यांची परमेश्वराच्या ठिकाणीं श्रद्धा जडली. आतां डॉ. भांडारकर हे मूर्तिपूजक नव्हते, ते निराकार प्रभूची सगुण आराधना करीत असत.

हीच भक्ति व हेंच प्रेम परमेश्वराचें साकार रूप कल्पून आपल्या इष्ट मूर्तीपुढें मनोभागानें पूजाअर्चा करणाऱ्या खऱ्या प्रेमी भक्तांत दिसून येतें. भावना तीच. प्रेम तेंच. फळ तेंच. तीच संतोषवृत्ति.

श्री नामदेव, त्याचे सर्व कुटुंब, दासी जनाबाई, निवृत्तिनाथ, ज्ञानदेव, मुक्ताबाई, एकनाथ, रामदास, तुकाराम, तुळसीदास, सूरदास वगैरे सर्व संतांच्या वचनांत हाच प्रेमानंद मूर्तिमंत दिसून येतो. हीं षट्शास्त्रें शिकलेली माणसें नव्हतीं.

परंतु त्यांच्या उत्कट प्रेमामुळें अनंत कोटि ब्रह्मांडाचा नायक त्यांचा झाला. त्यांची किंमत सामान्य जनतेला कळावी म्हणून त्यांच्या करवीं आपले गुणानुवाद गावविले, एवढेंच नव्हे तर तऱ्हतऱ्हेचे खेळ देखील खेळला. हे खेळ अथवा चमत्कार होऊं शकतात काय ? हे प्रकार खरोखरीच झाले काय? याचा विचार दुसऱ्या लेखांत होईल. तूर्त इतकेंच पुरे आहे कीं, हीं न शिकलेलींसवरलेलीं माणसें आज आम्हा सर्वांपुढें आदर्शवत् आहेत. आणि त्यांच्या कवनानीं असंख्य स्त्रीपुरुषांना समाधान वाटत आहे.

अगदीं अलीकडे न शिकलेलेसवरलेले, पण सर्व जगाला हालवून सोडणारे असे आदर्शवत् सत्पुरुष श्रीरामकृष्ण परमहंस. हे श्रीकालीमातेचे एक पुजारी. शिक्षण नाहीं कांहीं नाहीं. पण त्यांच्या निस्सीम प्रेमावर श्री जगन्माता लुब्ध झाली, आणि त्यांना अनिर्वचनीय ब्रह्मानंदाचा लाभ दिला. ह्या सत्पुरुषाचें दर्शन होईपर्यंत समाधि ही काय स्थिति आहे याचें केवळ पुस्तकीज्ञान होतें. पण जेव्हां कै. केशवचंद्र सेन ह्या ब्रह्मसमाजाच्या एका पुढाऱ्यानें त्यांचें अगाध ज्ञान, त्यांची समाधि स्थिति, व इतर सर्व लीला

आपल्या डोळ्यांनीं पाहिल्या तेव्हां त्यांच्या डोळ्यांत अंजन पडून त्यांनीं "नवविधान" ही एक नवीन संस्था स्थापन केली. लेखकाला एक्कें स्मरतें कीं, सुमारें १८८२ सालीं प्रार्थना समाजाचे कांहीं सभासद लेखकाच्या वडीलांजवळ ह्याविषयीं चर्चा करताना केशव बाबू हे एका ढोंगी (a fraud, a charlaran) पुजाऱ्याच्या नादीं लागले आहेत असें बोलले. लेखकाचे वडील अत्यंत शांत प्रकृतीचे गृहस्थ होते. ते म्हणाले, "मी केशवबाबूंस चागलें ओळखतों, ते केव्हांहो आडमार्गानें जावयाचे नाहींत."

कालांतरानें जेव्हां श्री विवेकानंदांनीं हिंदु संस्कृतीचा पश्चिमेस डंका गाजविला, आणि हिंदु संस्कृति ही एक अत्यंत तेजस्वी संस्था आहे अशी जाणीव पाश्चात्यांना आणि त्यामुळें आमच्यांत आणून दिली, त्या वेळीं हेच श्री परमहंसांना ढोंगी म्हणणारे गृहस्थ त्यांचे गोडवे गाऊं लागले.

परमेश्वराच्या अस्तित्वाला आधुनिक पाश्चात्य शास्त्रांच्या शिकवणुकींचा मुळींच बाध येत नाहीं. उत्क्रांतितत्त्व तर त्याची लीला अधिक जोरदार रीतिनें दाखवीत आहे. या उत्क्रांति तत्वांचा विचार दुसऱ्या लेखांत करण्यांत येईल.

श्री मद्भगवत्गीतेवर असंख्य टीका व विवेचनें झालेलीं आहेत. तीं त्या त्या टीकाकारांनीं आपआपल्या अनुभवाप्रमाणें लिहिलेलीं व केलेलीं आहेत. अलिकडील प्रसिद्ध टीका म्हणजे कै. टिळकांची. त्यांनीं कर्मयोगावर जोर देऊन श्री गीतेचें महत्त्व जाहीर केलें, तें सध्यांची परिस्थिति पाहातां पुष्कळानां पसंत पडेल ह्यांत शंका नाहीं. तरी पण मुंबईचे प्रसिद्ध डॉ. वसंतराव रेळे ह्यांनीं इंग्रजी भाषेंत केलेली श्री गीतेवर टीका, तसेंच त्यांचें दुसरें पुस्तक धी मिस्टीरिअस कुंडलिनी हीं आधुनिक विद्वानांनीं जरूर वाचावीं अशी माझी त्यांना नम्र विनंती आहे.

कालांतरांतले होऊन गेलेले अर्जुन व श्री भगवान कृष्ण व त्यांची लीला क्षणभर बाजूला ठेवून, सध्यां हयात असलेले संसारत्रस्त प्रत्येक

देहधारी स्त्रीपुरुष हाच अर्जुन समजून व त्याच्या शरीरांत श्रीकृष्ण भगवंताचा कसा खेळ चाललेला आहे, आपणा प्रत्येकास हें दैन्य, हें क्लीवत्व टाकून संसाररूप मायेतून आपल्याच शरीरद्वारें परमेश्वराला आपलेंसें कसें करतां येईल, हें विचार करण्यासारखें आहे. इतकेंच नव्हे तर आपल्या आयुष्याचें तेंच एक ध्येय आहे.

तरी पण सवाल उभा राहातोच कीं, देवाचें अस्तित्व मानावयाचें कशाकरितां ? आम्हीं हे सर्व गुलामगिरीचे विचार टाकूं पाहातों आणि तुम्हीं त्याचें विवेचन पुनः पुन्हां कशासाठीं करतां ? सध्यांचें जग व्यापारी दृष्टीचें आहे, तर देवाचें अस्तित्व मानून त्यांत फायदा काय ?

ह्याला उत्तर हेंच कीं, व्यापार, धंदा, संसाराची धडपड ही सर्व सुखासाठीं ना ! ह्या सुखाच्या पाठीमागें लागतां तें दूर दूर पळतें हा तर प्रत्येकाचा अनुभव आहे. संत म्हणतात " सुख पाहतां जवा पाडें, दुःख पर्वताएवढें. " हें खरें ना ? लोकेषणा व वित्तेषणा मिळवितांना कधीं तरी तृप्ति होते काय ? सार्वभौम राजा सुखी असतो काय ? तुम्ही आम्ही सुखी आहोंत काय ? " जगीं सर्व सुखी असा कोण आहे, विचारी मना तूंचि शोधूनि पाहें" असें श्रीसमर्थ रामदास स्वामी बोलले तें खरें आहे ना ?

असें जरी आहे, तरी निद्रावश झालेलें माणूस जेव्हां गाढ झोंपेंतून जागें होतें तेव्हां तें म्हणतें, " मला बरें वाटतें. " ज्ञानेंद्रियें जेव्हां जेव्हां आपआपल्या इंद्रियद्वारां अनुभव घेतात, तेव्हां तेव्हां तें जरी क्षणिक सुख असलें तरी त्याची आठवण होऊन, हें सुख निरंतर कसें मिळेल, व माझ्या जवळ तें कायमचें राहील काय, ह्या विचारानें मनुष्य दुःखी होतो. हें कायमचें सुख आपणा स्वतःमध्यें आहे. तें मिळविण्यासाठीच परमेश्वराची भक्ति आणि त्याचें चिंतन अंतर्बाह्य प्रभूच्याच कृपेनें त्याचें सान्निध्य जाणून अनुभव घेऊन, हें कायमचें सुख प्राप्त करून घेतां येतें, व इतर कज्जा प्राण्यांस तें देतां येतें.

हें संताच्या पायांपाशीं कळून व दिसून येतें. संतांइतके कनवाळू कोणीही नाहींत. परमेश्वरी चैतन्यामध्यें हे लीन झाले असल्यामुळें सर्वांचीं अंतःकरणें त्यांच्यापुढें आरशासारखीं लख्ख. परमेश्वराकडे लक्ष लागावें म्हणून लहानथोर सर्व प्राण्यांच्या आध्यात्मिक कल्याणाकडे त्यांचा यत्न सदोदित चाललेला असतो. ते त्यासाठीं आपला स्वतःचा देह एकसारखे कष्टवीत असतात. हा प्रकार श्रीसाईबाबांकडे अहर्निश चालावयाचा. कोणाच्याही शरीरांत दुखूं लागलें कीं, त्यानें बाबांचा धांवा करावा. कीं इकडे बाबांनीं तें दुखणें आपल्या स्वतःच्या शरीरांत ओढून घेऊन त्या प्राण्याची त्या दुःखापासून सुटका व्हावी. हे प्रकार अनेकांनीं शिरडीस श्री सांईबाबाच्या पायांजवळ बसून पाहिलेले आहेत.

निवळ कास्मिक एनर्जी ह्या कोरडया शब्दानें समाधान व्हावयाचें नाहीं. मागें सांगितल्याप्रमाणें कास्मिक एनर्जी, एक अफाट, अगम्य, अतर्क्य, अनिर्वचनीय, सर्व शक्तिमान, न आदि न अंत अशी आहे. तिलाच श्रीहरि, परमेश्वर, गॉड, अल्लाह असें नांव देऊन, तिच्याच इच्छेनें हीं सर्व अनंत कोटि ब्रह्मांडें आपणांसारख्या क्षुद्र प्राण्यांसहित निमार्ण झालेलीं आहेत. तीच त्याची लीला, त्याची माया, तीच श्री अन्नपूर्णा, श्री दुर्गा, श्री सरस्वती श्री भवानी, श्री हिंददेवी, तिच अस्तित्व जसें बाहेर तसेच आपल्या आंत परिपूर्ण आहे, त्याचा अनुभव घेऊन अखंड सुख प्राप्त करून घेण्याचें व जनतेला देण्याचें आपलें आद्य कर्तव्य आहे.

येथें पुन्हाही आधुनिक पाश्चात्यशास्त्राचे अभ्यासी असें म्हणतील कीं, क्वचित थोडयांना अशा सुखाची प्राप्ती होते. सामान्य जनतेला त्यापासून काय फायदा ? तुम्ही त्याना असेच " मतामताच्या गलबल्यांत " दीनदुबळे ठेवणार काय ? त्याला जबाब एवढाच कीं, जर तुम्ही ईश्वराचें अस्तित्व मानून सन्मार्गानें चालाल तर सामान्य जनता तुमचें तात्काळ अनुकरण, करील. तुम्ही पाश्चात्त्याचे केवळ दुर्गुण घ्याल तर जनता त्याप्रमाणें तुमचें अनुकरण करील.

सन १८६१ साली जेव्हां लेखकाच्या वडिलांनीं आपल्या पहिल्या मुलाला आपले परमप्रिय स्नेही कै. रामचंद्र बाळकृष्ण, करसनदास मळजी, व वासुदेव बाबाजी नवरंगे, ह्या गृहस्थांबरोबर विलायतेला शिक्षणासाठीं पाठविलें त्या रात्रीं, धर्म बुडाला, धर्म बुडाला, असा पुकारा करून चांगल्या शिकलेल्यासवरलेल्या लोकांनीं कांदेवाडींतल्या आमच्या राहत्या घराला आग लाविली. पोलीस धांवून आले, आणि त्यांनीं ती आग विझविली. आज आपले पंधरा हजारावर विद्यार्थी पाश्चात्य देशांत शिकत आहेत आणि सुमारें तीन कोटी रुपये त्यांच्या शिक्षणाप्रीत्यर्थ आपली जनता दरवर्षी खर्च करीत आहे.

पाश्चात्यांच्या विद्येपासून उत्तम तें आपण जरूर घेतलें पाहिजे. त्यांच्या शोधांकडे पूर्ण लक्ष्य देऊन, त्याप्रमाणें आपण शोध करून, जगांत पुढें पाऊल टाकलें पाहिजे. असें करतांना आपलें शील कायम ठेवून आपल्या पूर्वजांनीं आपल्याजवळ परमेश्वराच्या स्मरण रूपि भक्तीचा ठेवा ठेवलेला आहे तो ज्यानें त्यानें आपआपल्या भूमिकेप्रमाणें कायम ठेवून आपली अध्यात्मिक उन्नति केली पाहिजे. अध्यात्मिक उन्नतीनें आपला आत्मविश्वास वाढेल, आत्मविश्वासानें आपल्या नैसर्गिक नेतृत्व व कर्तृत्वशक्तींचा पूर्ण विकास होईल. मात्र हें करतांना फसवेगिरीचा सर्व नीच प्रकार साफ दूर केला पाहिजे; तरच आपण पुन्हा उन्नतिप्रत जाऊं. हें पाहून जनता आपलें तात्काळ अनुकरण करून, सध्यांचें क्लीबत्व धडाडीनें टाकून देईल.

श्री साईबाबांनीं प्रेमानें संबोधिलेला.

"म्हातारा"

## भूतदया

"अग इकडे ये, लवकर ये, ही पाहा तुझ्यासाठीं कोणी भट ठेवून गेली आहे ती."

पतिरायाचे शब्द ऐकतांच, सुंदराबाई घराच्या मागल्या पडवीतून पुढल्या ओसरींत धांवून आल्या. यजमानांनीं एका कोंपऱ्याकडे बोटानें दूर

केली. सुंदराबाई तिकडे पाहातात तों एक सुमारें ४।५ वर्षांची पोर दडून बसलेली दिसली. केसांच्या झिंज्या झालेल्या, हातापायांच्या निव्वळ काड्या, बरगड्या बाहेर निघालेल्या, डोळे, गाल, आणि पोट यांचे खळगे झालेले, कमरेभोंवतीं एक चिटकून अतिसाराने घाण झालेलें, त्याच्यावर माशा भणभणताहेत, वर्ण अत्यंत काळा, मुद्रा कुरूप, आणि भेसूर, अशी ती दारिद्र्यानें गांजलेली लहान मूर्ति पाहून सुंदराबाईंचें अंतःकरण कळवळून आलें, डोळ्यांतून पाणी वाहूं लागलें.

" आई, आईग, कोण चांडाळीण तुला टाकून गेली ग !" असें बोलून त्या पोरीला उचलून त्यांनीं तिला घरांतल्या मागल्या पडवींत नेलें. गरीबाची लहान पोर ती. घाबरली. आणि बोलली " बाय मला मारूं नको. आय् फांटला मला ठेऊन शान गेली. आन् सांगलं हकड् बस मी खायला घेऊन येतं थतवर हकडून हालूं नको. म्हून मी आयची वाट बग तूं. "

सुंदराबाईनीं तिला धीर दिला आणि सांगितलें. " तुझी आय आली म्हणजे तिच्याबरोबर जा. "

असें बोलून तिच्या झिंज्यांना तेल लावलें. तेल लावतां क्षणीं आणि केंस विंचरतांना शेंकडों लिखा भरभर निघाल्या. तें पाहाताच घरच्या ब्राह्मण स्वयंपाक्याला आणि बाल्या नोकराला किळस येऊन रागही आला, पण मालकिणीपुढें त्यांचें कांहीं चाललें नाहीं.

पोरीला गरम पाण्यानें आंघोळ घालून स्वच्छ केल्यावर थोडें गरम दूध पाजलें. पोर म्हणाली " आये आणखी दूध देना ? " माउली म्हणाली, " बये जास्त दूध तुला जिरायचं नाहा. आतां तूं नीज. " असें बोलून आपल्या स्वतःच्या पातळाची घुवट घडी काढून, तींत त्या पोरीला गुंडाळून आपल्या स्वतःच्या बिछान्यावर निजवितां क्षणींच ती पोर झोंपी गेली.

हें सर्व चाललें असतां आजूबाजूंच्या घरांतून ब्राह्मण परभू आणि शेणवी गृहस्थांच्या स्त्रिया हा सोहळा पहावयास धांवून आल्या. शेजारच्या रामभाऊंच्या श्रीराममंदीराचे मालक—त्यांना पण रामभाऊ म्हणत—धांवून

आले. ते म्हणाले, " अहो बायजाबाई "—सुंदराबाईंना ह्या नांवानें लहान-थोर सर्व लोक संबोधित असत--" हें तुम्ही काय मांडलेंत ! अहो तिच्या कपाळावरच्या गोंदण्यावरून ही पोर तर महारमांगाची दिसते. " बायजाबाई बोलल्या "रामभाऊ, असे ना का कोणाची, माझ्या आसऱ्याला आली, आणि तिला मी हांकलून दिली, तर देव काय बोलेल ? " हें ऐकून रामभाऊंच्या आणि त्या स्त्रियांच्या डोळ्यांना पाणी आलें.

आदल्या वर्षी पाउसाच्या कमतरतेमुळें दुष्काळ पडला होता, त्यामुळें हजारों लोक पायवाटेनें मुंबईला चरितार्थसाधनासाठीं आले होते. त्या वेळीं आगगाडया नव्हत्या. विहाडचें तळें नव्हतें. वाखा म्हणे मी. शेंकडों, हजारों लोक अन्न अन्न करीत भुकेनें व्याकुळ होऊन मेले. हजारों वाख्याच्या तडाख्यांत सांपडून मेले. कोण त्यांचे हाल ! किती भयंकर त्यांचें दैन्य आणि विपन्नावस्था ! मुंबईंतल्या धनसंपन्न लोकांनीं अन्नसत्रें वगैरे काढून आपआपल्या परीनें पुष्कळ मदत केली. ती किती पुरणार ! त्यातून जे वाचले त्यांना परत देशीं जाण्याच्या साधनांच्या अभावीं भीक मागून गल्लोगल्लीं फिरावें लागलें.

नंतर पावसाळा सुरू झाला. आषाढ महिन्यांत पाऊसाची जी झोड मुंबईंत लागत असते ती केवळ मुंबईकरांनाच ठाऊक. कपडे वाळावयाचे नाहींत. चुली पेटावयाच्या नाहींत, धुरानें जीव हैराण व्हावयाचा, सैंपाकाला मनस्वी वेळ लागावयाचा. घराचें लांकूड सामान देखील सर्द व्हावयाचें. मागल्या पडवींत छप्पर धुरानें काळें झालें असल्यामुळें. त्या सर्द छपरांतून वाळत घातलेल्या कपडयांवर काजळाच्या काळ्या पाण्याचे टिपके पडून कपडयांची कशी घाण होत असते ती मुंबईकरांनाच ठाऊक.

अशा पावसाळ्यांत सशक्त मनुष्याला देखील सर्दीमुळें अमांश आणि अतिसार होतात. मग अन्नासाठीं तळमळणाऱ्या आपद्ग्रस्त गरीबाचे व त्यांच्या पोरांचे कसे हाल होत असतात ते पाहावयास दूर जावें लागत नाहीं. नंतर अन्नासाठीं लहान लहान चोऱ्या करून आणि पुढें बदमाषांच्या आखाड्यांत

सांपडून पहिल्यानें पहिल्यानें खिसेकापू, पुढें बिलंद चोर, त्याचप्रमाणें वेश्या, ही त्यांचीं रूपांतरें कशीं होतात हें पोलिसचे रिपोर्ट सांगूं शकतात.

काळजीपूर्वक जतन आणि खाऊपाऊपिण्याची व्यवस्था लागल्यामुळें ती पोर तीनचार महिन्यांत हुशार झाली, आणि बायजाबाईंना पोरवयाप्रमाणें गृहकृत्यांत मदत करूं लागली.

बायजाबाई त्या वेळीं अपत्यहीन होत्या असेंही नाहीं. त्यांना तीन सुंदर मुलें होतीं. मोठ्या मुलीचें वय सुमारें १०।११, मुलाचें वय ७।८ आणि धाकट्या मुलीचें ३।४.

बायजाबाईंचे पति नारायणराव मुंबईंत कस्टम खात्यांत मोठ्या हुद्दाबर नोकरीत होते. त्यांचें घर धूसवाडींत रामभाऊंच्या श्रीराममंदिरासमोर डाव्या हातावरचें पहिलें. धुसवाडींत ब्राम्हण, शेणवी, परभू गृहस्थांचीं घरें अद्यापि आहेत. त्या वेळचा सर्व गृहस्थांच्या स्त्रियांचा बायजाबाईबरोबर अत्यंत स्नेहभावाचा घरोबा होता. बायजाबाईंस लिहितांवाचतां येत असे आणि त्यामुळें त्यांच्या घरीं अथवा शेजारच्या श्रीराममंदिरांत श्रीरामविजय, श्रीहरिविजय, यांचीं पारायणें होत असत, तेथें त्या सर्व स्त्रिया कथाकीर्तन व पुराण श्रवणासाठीं जमत असत. बायजाबाईनीं आपल्या मुलांबरोबर त्या मुलीला देखील लिहावाचावयाला शिकविलें, आणि पुढें ती मुलगी त्या सर्व उंचवर्णांच्या स्त्रियांबरोबर श्रीराममंदिरांत कथा, कीर्तन, पुराण ऐकण्यासाठीं जाऊं लागली. अभिमानाची गोष्ट ही कीं, त्या पैकीं कोणीही स्त्रीनें अथवा त्या आणि दुसऱ्या मंदिरांच्या व्यवस्थापकांनीं त्या गरीब पोरीला हरकत केली नाहीं. इतकेंच नव्हे, तर त्या नंतर थोडयाच वर्षांनीं बायजाबाईचें जेष्ठ बंधु रा. ब. दादोबा पांडुरंग यांनीं स्थापन केलेल्या परमहंस सभेची, किरिस्तांवाच्या हातचा पांव खातात, एवढ्यावरून दाणादाण उडाली, तरी ह्या गरीब पोरीला देवळांत जाण्याला कोणीही मज्जाव केला नाहीं.

पुढें दिलगिरीची गोष्ट अशी घडली कीं, ही मुलगी सुमारें तेराचवदा वर्षांची झाली. त्या वेळीं ती एकाएकी नाहींशी झाली. बायजाबाईंचें तिच्यावर इतकें प्रेम जडलें होतें कीं, ह्या आघातानें त्या बहुतेक वेडयापिशा झाल्या. पुष्कळ शोध केला; परंतु कांहीं पत्ता लागला नाहीं. सरते शेवटीं असें अनुमान निघालें कीं, ख्रिस्ती बायांनीं तिला पळवून नेलें असावें. त्या वेळीं ख्रिस्ती धर्मोपदेशक हिंदी बायांचा हिंदूंच्या घरांतून फारच सुळसुळाट असे. हिंदुधर्माचें हिडिस स्वरूप दाखवून, हिंदु स्त्रीपुरुषांना ख्रिस्ती करण्याकडे त्यांचे आटोकाट प्रयत्न सतत चालू होते हें लेखकानें स्वतः पाहिलेलें आहे. पाश्चात्य शिक्षणाच्या प्रभावानें आणि आपल्या देशावर असलेल्या त्यांच्या स्वामीत्वामुळें त्या वेळच्या शिक्षण घेतलेल्या तरुणांच्या मनावर भयंकर आघात झाला होता. हा आघात ब्रह्मसमाज, प्रार्थनासमाज, आर्यसमाज ह्या संस्थांनीं आणि त्यानंतर ३० वर्षांनीं, श्रीविवेकानंदांनीं जर परतवला नसता तर आपली स्थिती विशेष निःसत्व झाली असती.

ही गोष्ट ऐशीं वर्षांपूर्वीची आहे. लेखकानें खुद्द बायजाबाईंच्या, आपल्या पित्याच्या, व वडील काकांच्या, तोंडून ऐकलेली आहे. बायजाबाईंची तेजस्वी व ममतायुक्त मूर्ती लेखकाच्या मन.चक्षूपुढें उभी आहे. अशी दुसरी मायाळू स्त्री त्यानें अद्यापि पाहिली नाहीं. श्रीसांई बाबांनीं लेखकाच्या कुटुंबाला तिच्या लहानपणींच्या गोष्टींच्या आठवणी सन १९११ सालीं तिला तिच्या पहिल्या दर्शनाच्या वेळीं दिल्या, आणि ज्या आठवणींचीं तिला त्या वेळीं पूर्ण विस्मृति होती, त्या वेळीं बायजाबाईंची आठवण काढून "आये तुझी आजी ( आईची आई ) लई नामी बाई माणूस होती. मी तिला ओळखत होतों." असें बोलले.

पाश्चात्य शिक्षणानें आपलें पाऊल, आपलें शीलसंवर्धनापुढें गेलें आहे किंवा कसें, याचा विचार करतांना मन घोटाळ्यांत पडतें. जरी कर्मठपणाचा त्या वेळीं फारच जोर होता, जरी मतामतांच्या बाबतींत प्रखर विरोध होता, तरी लेखकाला त्या वेळीं सर्व निरनिराळ्या जातीजातींतल्या स्त्रीपुरुषांना पर-

स्पर्धाविषयीं जो आदर व अभिमान दिसून येत होता, तो आज नाहीं. हें कां व कसें, आणि आपलें कोठें चुकत आहे, आपण खरोखरी उच्च ध्येयाप्रत जात आहोंत, कीं घसरून खालीं पडत आहोंत याचा ज्यानें त्यानें सूक्ष्म विचार करावा.

सन १९१४ च्या सालीं शिरडीस असतांना लढाईसंबंधानें लेखकाच्या मनांत कांहीं विचार आले. त्याच वेळीं त्याच्या कुटुंबानें लढाईविषयीं बाबांना उघड विचारलें, तेव्हां बाबा म्हणाले " आये लई खराब दिवस येणार आहेत. लोक गल्लोगल्लीं नागवे फिरतील, एकमेकांना फाडफाडून खातील. तेव्हां देवाची आठवण होईल. मग पुढें चांगलें दिवस येतील " ह्या बाबांच्या शब्दांचा वाचक पूर्ण विचार करतील अशी आशा आहे.

सर्व भक्तांचा चरण रज
" म्हातारा "

# अनुभव

दसऱ्याचा दुसरा दिवस. आश्वीन महिना. सन १९१७ सालची गोष्ट. ह्या दिवशीं दोनप्रहरीं श्री साईबाबांच्या पायापाशीं माझा मित्र, त्याची बायको व मी असे बसलों असतां, श्री माझ्या मित्राच्या बायकोला म्हणाले " आये, तुला काय पाहिजे माग." बाईनें बाबांच्या पायांवर मस्तक ठेवून त्यांना नमस्कार केला, आणि त्या म्हणाल्या "बाबा, मला जन्ममृत्यूच्या फेऱ्यांतून सोडवा. " बाबा प्रेमानें हंसून म्हणाले " आये हेंच मागितलेंस ? आपण काय मरायला आलों आहोंत !" बाई बिचारी गोंधळांत पडली. तरी नम्रतेनें ती बोलली " बाबा तुम्हीं काय बोलतां तें मला मुळींच समजत नाहीं. " तेव्हां बाबा तिच्या नवऱ्याकडे बोट दाखवून म्हणाले " ह्याला विचार तो तुला सांगेल." मित्र म्हणाला " बाबा आपणच सांगावें. मी कसें समाधान करूं शकेन ? " एवढ्यांत कांहीं मंडळी दर्शनासाठीं आली, तेव्हां बोलणें तसेंच राहिलें. काहीं वेळानें बाबांनीं सर्वांना उदी घेऊन वाडयांत जाण्याला सांगितलें त्या प्रमाणें आम्हीं सर्वांनी श्रीच्या

हातून उदी घेतली. श्री उदी देतांना त्यांच्या उजव्या हाताच्या अंगुठ्याने भुंवयांच्या मध्यें किंचित् जोर देऊन व दुसरीं बोटें भक्ताच्या डोक्यावर ठेवून सर्वही पांच बोटांच्या उदीच्या खुणा त्याच्या डोक्यावर उमटवीत असत. उदी देतांना श्रीनीं बाईला आपल्या नवऱ्यापाशीं खुलासा मागण्याचा पुन्हा इशारा दिला आणि बोलले " आये बाला विचार. आणि घंट्या मरानें पुन्हा या बरें."

आम्ही दीक्षितांच्या वाडयांत उतारूच्या जागीं आल्यावर बाईचा आपल्या भ्तारावरोबर झालेला संवाद लेखकानें ऐकला तो स्मरणपूर्वक देत आहें.

" बाबा हें काय बोलले मला मुळींच समजत नाहीं. "

" मला तरी काय कळतें ? "

" मग आपल्यापाशीं खुलासा म्हावा कसा ? "

मित्र कांहीं वेळानें विचार करून बोलला " हें पाहा आपण सर्व खरे-खरे अमर आहोंत ही जाणीव देण्याच्या हेतूनें बाबा बोलले असावे. "

" मरण हें ठरलेलें आणि आपण अमर कसे ? तुम्ही कांहीं तरी बोलतां श्री मारुतीराय, विभीषण वगैरे अमर." बाई बोलली.

"तें तर खरेंच. पण तूं विचार कर.आपण मरतों तेव्हां काय होतें?'

"शरीर जागच्या जागीं राहातें, आणि जीव निघून जातो. "

" जीव म्हणजे काय ? "

" जीव म्हणजे जीव ! "

" बरें तो जीव काय करतो ? "

" दुसरीं शरीरें धरतो, संसार करतो, आणि त्याचीं तीं शरीरें पुन्हा मरतात. म्हणूनच तर जन्ममरणाच्या फेऱ्यांतून सोडविण्यासाठीं बाबांजवळ मी मागणें केलें ! "

"बरें तूं झोपी जातेस तेव्हां तुझा जीव कोठें असतो ? "

" माझ्या शरीरांत ! "

" त्याची त्या वेळीं तुला आठवण असते काय ?"

" नाहीं. "

" झोंपेंतून जागी झाल्यावर तुला बरें वाटतें तें कसें ?"

" कोणाला ठाऊक, बरें वाटते एवढें मात्र खरें. "

" एकूण जीव पुनः पुनः जन्म घेत असतो, त्याचीं तीं तीं शरीरें मात्र मरतात, जीव कांहीं मरत नाहीं असें तुला खात्रीपूर्वक वाटतें ना ! "

" होय. "

" तर मग पुन्हां पुन्हां जन्ममरणाची कटकट केव्हां नाहींशी होते?"

" देवाची भेट झाल्यावर. "

" आतां बाबा तुला साक्षात् देवरूपी दिसतात असें तूं म्हणतेस तर तूं आतां जन्ममरणांतून सुटलीस. "

" अजून तशी खात्री वाटत नाहीं. "

" कां ?" बायको बापडी स्तब्ध झाली.

मित्र म्हणाला, देवाचें भेटणें म्हणजे साक्षात्कार होणें. देवाची लीला अगाध आहे. भक्तासाठीं त्या भक्तानें इच्छिलेलें रूप घेऊन त्याला त्याप्रमाणें भेट देण्याला तो पूर्ण शक्तिमान आहे. आपल्या प्रिय भक्तासाठीं ता काय न करूं शकेल ? तरी पण अशी जेव्हां देव भेट देतो त्या साक्षात्काराच्या शेवटीं त्या आपल्या प्रिय भक्ताला आत्मसाक्षात्कारानेंच आपलें खरें रूप दाखवितो. आत्मसाक्षात्कारानें भक्ताची पूर्ण अनुभवानें खात्री होते कीं देव आणि आपण निरनिराळे नाहींत. जीव आणि शिव एकच. बाबांना तूं बोलतांना ऐकलें आहेस ना कीं "जो बोलतो कीं बाबा इकडे शिरडींत बसलेला मी पाहिला त्यानें बाबाला मुळींच नाहीं बघितला ? "

" होय असें ते बोललेले मी ऐकलें, आणि विचारांत पडलें कीं असें कसें ? "

"त्याचें कारण आपण शिरडीत देहधारी बाबा पाहतो, अस्तां त्यांचें सर्व करणें आपल्या सकलेच्या सर्वसी आटोक्याच्या बाहेर आहे. त्यांचे शरीर म्हणजे तुझ्या माझ्या सारखें शरीर नाहीं. आपल्याला त्यांचे दर्शन आणि त्यांचा वरदहस्त आपल्यामाथ्यावर पडला हें आपले लहान सहान भाग्य नाहीं, तरी पण बाबांचें खरें स्वरूप जाणण्याला आ... त्याला आत्मसाक्षात्कारी झालें पाहिजे, म्हणजे जीव आणि शिव आपल्यामध्ये त्याप्रमाणें सर्वांमध्यें एकच आहे असा पूर्ण अनुभव येऊन बाबांचें खरें स्वरूप आपल्याला दिसेल. तूं स्वतः शिवस्वरूपी आहेस."

"काय मी शिव ? छे छे असें बोलणें पाप आहे. मी जीव."

"होय असें तुला वाटणें साहजिक आहे आणि त्या मुळेंच आपल्याला अनेक जन्म घ्यावे लागतात, हे जन्म घेतां घेतां जेव्हां मनुष्य संसार रूपी यातनांना कंटाळून जाऊन परमेश्वरावर प्रेम करावयास लागतो, तेव्हां तो दयाळू प्रभु भक्ता साठीं वेडा होऊन तो श्री साईबाबांसारखीं आपलीं मार्गदर्शक दैवी रूपें दाखवून त्यांचें कोट कल्याण करतो. गम्मत अशी कीं, तो भक्त प्रेमानंदांत तल्लीन होऊन देहभावनेवर असतो, तेव्हा देवा तूं माझा धनी, मी तुझा नोकर, माझ्या हातून तुझी कांहीं तरी सेवा होऊंदे, असें म्हणून शरीरानें, वाचेनें, आणि मनानें एकासारखे प्रयत्न करीत असतो. त्या नंतर प्रेमानंदांत विशेष लीन झाला म्हणजे सर्वसाक्षी सर्वांतर्यामी प्रभु माझाच आहे अशी त्याची भावना होते, ह्या वेळी बाह्य सृष्टीची व आपल्या स्वतःच्या शरीराची त्याला विस्मृति व्हायला लागते. ती पूर्ण विस्मृति होऊन, म्हणजे झोंपी नव्हे हो, तो समाधिस्थितींत गेला म्हणज प्रभु व मी एकच आहोंत हें त्याच्या पूर्ण अनुभवाला येऊन त्याला अत्यानंद होतो.तो आनंद कसा, काय, तूं काय अनुभविलेंस, बगैरे तो देहभावनेवर परत आल्यावर त्याला विचारतां, तें त्याला सांगतां येत नाहीं."

"आतां तूं समजलीस बाबा कां म्हणाले 'आपण काय मरायला आलोंत' म्हणून ? त्यांच्या शब्दांनीं आपल्या अमरत्वाची खात्री खरोखरीच झाली ना?"

ती म्हणाली " होय, पण अजून माझें समाधान होत नाहीं. " तो म्हणाला " आत्मसाक्षात्कार होई पर्यंत पूर्ण समाधान होणें अशक्य. आतां आपण बाबांच्या दर्शनाला जाऊं तेव्हां तूं आणि मी मनांत एकच विचार ठेवावयाचा कीं, " बाबा आम्ही अज्ञान लेकरें आहोंत, आपली आमच्यावर कृपा असावी "

मी हें सर्व लक्षपूर्वक ऐकत होतों. आणि जेव्हां आम्ही बाबांच्या दर्शनासाठीं पुन्हा गेलों तेव्हां जरी चार मंडळींची गर्दी होती तरी त्यांतून श्री माझ्या मित्राच्या बायकोला बोलले " आये " मित्राकडे बोट दाखवून " ह्याचे सर्व बोल मी ऐकत होतों. ते ध्यानांत ठेव. माझे बाळ गोपाळ आले, म्हणजे मला लई बरं वाटतं. आणि दोन घांस मी आवडीनें खातों. "

सर्व भक्तांचा चरणरज

" म्हातारा "

श्रीमाधवराव देशपांडे आज दुपारीं भेटावयास आले. श्रीसद्गुरु माउली-विषयीं बोलतां त्यांनीं " जया मनीं जैसा भाव, तया तैसा अनुभव " या श्रींच्या आरतींतल्या एका वाक्यावद्दल एक मजेचा अनुभव सांगितला तो येणेंप्रमाणें:—

" सुमारें चवदापंधरा वर्षांपूर्वीची गोष्ट. श्रीरामनवमीच्या यात्रेचा दिवस. त्या दिवशीं बेसुमार यात्रेकरू श्रींच्या-बाबांच्या दर्शनासाठीं आले होते. किमान पक्ष साठपांसष्ट हजारावर यात्रा जमली होती. मामलेदारसाहेब, इन्स्पेक्टर ऑफ पोलीस आणि इतर लहानथोर अंमलदार बंदोबस्तासाठीं हजर होते. बाबा सकाळपासून बसले होते ते अकरा वाजून गेले तरी आपल्या जागेवरून हालले नाहीं. भक्तमंडळीनीं पोलीसला विनंती केली कीं, यात्रा कांहीं वेळ थांबवून ठेवा आणि देवाला न्याहारी करूं द्या. बाबा म्हणाले, " मला भूक नाही ! "

या वेळीं मशिदीच्या आवारांत आणि बाहेर माणसांची रेटारेटी चालली होती. उन्हाळ्याचा तो दिवस, अंगांतून घामाच्या धारा पाझरत चालल्या आहेत; पण यात्रेकरूंचा उत्साह कांहीं अपूर्व होता. प्रत्येक देवाची दर्शनासाठीं धडपड चालली होती.

अशा वेळीं एक मराठमोळ्याची बाई, सुमारें पांसष्ठ-सत्तर वर्षांची, वार्धक्यानें शरीर कृश झालेलें, थकलेलें, आंगांत कांहीं त्राण नाही अशी, आवाराबाहेर गर्दीत सारखी आक्रोश करीत होती-" अरे ! मज गरीब म्हातारीवर दया कर रे ! बाबा ! तुझं दर्शन देरे " असें ओरडत ती भयंकर उन्हांत सारखी तळमळ करीत होती. त्या गलबल्यांत तिच्याकडे पाहतो कोण आणि तिचें ऐकतें कोण ? " इतक्यांत मी त्या गर्दीतून देवाच्या सेवेसाठी जात होतों,त्या वेळीं त्या म्हातारीची ती दयाजनक हांक ऐकून,जी हांक देवाला ( श्री साईबाबांना ) केव्हांच पोंहचली होती, त्यामुळें देवाच्या प्रेरणेनें माझ्या मनांत दया उत्पन्न झाली. म्यां त्या म्हातारीचा हात पकडला, आणि म्हटलं, चल बये माझ्याबरोबर. मी तुला देवाचें दर्शन घडवितों. त्या म्हातारीला जो आनंद झाला तो मी अद्याप पावेतों विसरलों नाहीं. पोलिस पार्टी वगैरे मला ओळखत असल्यामुळें त्या भयंकर गर्दीतून व रेटारेटींतून आम्हांला वाव मिळाला. देवाच्या जवळ जातांच त्या म्हातारीनें आरोळी करून देवाच्या कमरेला घट्ट मिठी मारली. डोळ्यांतून अश्रूंचे पूरवाहत होते. कांहीं वेळपर्यंत तिच्यानें बोलवेना. देवानें तिच माथें आणि पाठ कुरवाळून तिला तिच्या घरच्या बारीकसारीक गोष्टी विचारल्या, आणि म्हटलें " आये मी कंवापासून तुझी वाट बघतुं ग ! तूं मला खायला काय आणलंस!" म्हातारीनें म्हटलें" बाबा, मी एक भाकर नि दोन कांदे आणले. वाट चालून चालून थकलें. सकाळला ओढयावर अर्धी भाकर नि एक कांदा खाल्ला. आतां मजपाशीं अर्धी भाकर आणि कांदा आहे तो तूं खा. " असें म्हणून आनंदानें पदराला बांधलेली ती अर्धी भाकर आणि कांदा देवाला दिला. देवानें ते पदार्थ तेथच्या तेथेंच खाल्ले. आणि म्हटलें " आये तुझी भाकर

मला लय गोड लागली ग ! " हें पाहून मला आनंदाचें भरतें आलें. म्यां विचार केला काय हा देवाची ही लीला !

त्या म्हातारीला आपण कृतार्थ झालें असें वाटलें. तिनें देवाच्या हातचा प्रसाद आणि उदीं घेतली आणि तेथून निघाली. पोलीस पार्टीनें तिला त्या गर्दीतून सुखरूप बाहेर काढलें. म्हातारी आनंदानें बेहोष झाली होती."

श्री माधवराव म्हणाले " बाबासाहेब, ही गोष्ट मी कधींही विसरणार नाहीं. म्यां मनांत खूप गांठ मारली कीं, ' जया मनीं जैसा भाव तया तैसा अनुभव ' या वाक्याप्रमाणेंच ही गोष्ट घडली आहे."

श्री माधवरावांना आणखी कांहीं असे अनुभव सांगा म्हणून आग्रह करतां ते म्हणाले, " पाहूंहो बाबासाहेब, देवाच्या स्फूर्तीप्रमाणें मी पाहिलेल्या सर्व लीला प्रसिद्ध होतील"

वांद्रें
ता. २२ सप्टेंबर १९२९ } रा. आ. तर्खड

## अश्वत्थवृक्ष

श्रीमद्भगवद्गीतेंतल्या १५ व्या अध्यायांत वर्णन केलेला अश्वत्थवृक्ष हा बहुतेक कांहीं तरी कल्पितवृक्ष असावा असें समजतात. पण सूक्ष्म विचाराअंतीं हा वृक्ष आपल्याच शरीरांत असलेला ज्ञानतंतूंचा समुदाय आहे अशी खात्री होते.

आपल्या डोक्यांतला मेंदु, हा, त्या वृक्षाच मूळ. त्याच्यापासून उत्पन्न झालेला पाठीच्या कण्यांत असलेला ज्ञानतंतुमय दांडा हा त्या वृक्षाचं बुंध. या बुंधापासून फुटलेल्या फांद्या, अथवा डहाळ्या हे मुख्य ज्ञानतंतूचें समुदाय, आणि त्या डहाळ्यांपासून निघालेलें सूक्ष्म तंतूंचें जाळें हीं त्याचीं पानें वगैरे. हा विचार ग्रहण केल्याबरोबर वर मूळ आणि खालीं फांद्या या श्रीकृष्ण भगवंताच्या विवेचनाचा ताबडतोब खुलासा होतो.

या वृक्षाच्या सहाय्यानें आपण किती तरी उच्च स्थितीप्रत जाऊन पोहोंचूं या ज्ञानाचा प्रकाश पडतो. या विषयाचा जितका विचार करावा तितका थोडाच आहे.

हा अश्वत्थ वृक्ष नाशिवंत आहे. देहपतनानंतर त्यांतून चैतन्यरूपी परमेश्वराचा खेळ बंद झाल्यावर देहासोबत या वृक्षाचा नाश होतो. परंतु जोपर्यंत त्यांतून चैतन्य खेळत असतें तोंपर्यंत या वृक्षामार्फत आपल्या शरीरांतल्या सर्व संसाररूपी आणि पारमार्थिक क्रिया चालत असतात. डोळे पाहतात, कान ऐकतात, नाक वास घेतें, श्वासोच्छ्वास चालू असतो, हृदय शरीरांतून रक्त खेळवितें, रसना पोषक असेंच अन्न ग्रहण करिते. जठराग्नि प्रदीप्त राहातो, तो अन्न पचन करतो, मलमूत्र घर्मरूपी त्याज्य वस्तू विसर्जन होतात. हात, पाय व त्वचा याच वृक्षाच्या हुकुमाप्रमाणें आपलीं कामें करितात. शुक्र आणि शोणित यांनी प्रजा निर्माण होते. मन आणि विचार हीं सर्व या वृक्षांतल्या चैतन्यरूपी आधारानें आपआपले उद्योग चालवितात.

देहाचा आणि बाह्यसृष्टीचा झोपेंत पूर्ण विसर पडत असतो. अशा वेळीं देखील जठराग्नि प्रदीप्त राहाण्यासाठीं श्वासोच्छ्वास, अन्नपचनादि क्रिया अबाधित चालतात. इतकेंच नव्हे तर स्वप्नस्थितींत वाघ, सिंह, झाडें, झुडपें, डोंगर, पहाड, दऱ्या, नद्या, समुद्र वगैरे मूर्तिमंत प्रतिसृष्टि तो देह निर्माण करतो, आणि तिची प्रत्यक्ष भावना त्या वेळीं जागृतावस्थेप्रमाणेंच हुबेहूब त्याच्या शरीरावर पूर्ण रीतीनें उमठते. हा प्रत्येक मनुष्याचा अनुभव आहे. चैतन्य जोंपर्यंत या वृक्षांतून बाबरत असतें तोपर्यंत बाह्यसृष्टीच्या पसाऱ्याचें ज्ञान होतें. ही झाली संसाराची गाष्ट. पण याउपरांत ह्या वृक्षाच्या ठिकाणीं असें कांहीं दुसरें अवर्णनीय व अफाट सामर्थ्य आहे कीं, भक्ति, उपासना, कर्म, ज्ञान अथवा योग यांच्या साह्यानें याच अश्वत्थ वृक्षामार्फत संसारांत राहून, संसार तरून जाऊन आपल्या शरीरांत असलेल्या अंतःसृष्टींतून साक्षात् चैतन्याचा अनुभव घेता येतो.

आपल्या हरिविजय या अप्रतीम ग्रंथांत श्रीधर कवि श्रीकृष्ण भगवंताच्या जन्माचें फारच बहारीनें वर्णन करितात.

आपुल्या हृदय गोकुळीं ।
शांति यशोदे जवळीं ॥
सेजे पहुडला वनमाळी ।
पुराणपुरुष तो पहा ॥

या ओंवीतला प्रत्येक शब्द अनुभवाचा आहे. ही ओंवी निव्वळ काव्य नाहीं. या एकाच ओंवीवरून श्रीधरकवि आत्मसाक्षात्कारी पुरुष होते असें खात्री पूर्वक वाटतें. नाहीं तर ते "पहा" हा अनुभवसिद्ध हुकमी शब्द कधींही योजूं शकते ना.

या एकच ओंवींत "हृदय गोकुळीं," "शांतियशोदे जवळी" "सेजे पहुडला" आणि "पुराण पुरुष" हे शब्द आत्मसाक्षात्कारी भक्ताशिवाय इतक्या अधिकारयुक्त वाणीनें कधींही निघावयाचे नाहींत.

पुष्कळ आधुनिक स्त्रीपुरुष आहेत कीं,ज्यांना श्रीकृष्ण ही काल्पनिक काव्यरूपी व्यक्ति आहे असें वाटतें आणि त्यांना श्रीकृष्ण भगवानाच्या गोकुळांतील लीला अतिशयोक्तीच्या आणि कांहीं प्रसंगीं त्याज्य अशा वाटतात.

लेखकालाही त्याच्या लहानपणीं अशाच विचाराचें शिक्षण मिळालें होतें; परंतु सर्वसाक्षी प्रेमळ प्रभूच्या आपल्या हृदयांत ज्या अवर्णनीय लीला चाललेल्या या संसारतापांतदेखील जसजशा त्याच्या अनुभवास आल्या, तसतशा आपल्या शरीरांत प्रत्यक्ष वावरणाऱ्या हजारों गोपींचें श्रीकृष्ण भगवंतांवर कसें निर्व्याज प्रेम आहे याची त्याला अंधुक, पण आनंदमयी खात्री होत गेली.

श्रीकृष्ण भगवंताचें गोकुळ आपल्या प्रत्येकाच्या हृदयांत आहे. आणि प्रत्येक देहधारिन् आपलें सध्यांचें शरीर टाकून देण्यापर्यंत, आणि त्यानंतर कर्मफलांचीं गांठोडीं घेऊन वासनात्मक सूक्ष्म देहांमार्फत दुसरीं अनेक स्थूल शरीरें धारण करितां करितां आणि त्यासोबत ही श्री गोपींची आनंदमयी लीला विशेष आणि विशेष अनुभवतां अनुभवतां आपल्या स्वतःच्या सच्चिदानंदरूपाचा आत्मसाक्षात्कारानें पूर्ण अनुभव घेतो त्याच

वेळी त्याला श्रीकृष्ण भगवंताच्या रासक्रीडेचें पूर्ण ज्ञान होतें. हें होईपर्यंत रासक्रीडेविषयी सर्व शब्दबल्गना व्यर्थ आहेत. अद्वैतांची समाधिस्थिति ती हीच. ती अनुभवल्यानंतरही वर्णन करावयाला वाणी असमर्थ आहे.

## अनुभव

"आपण कोण ? आपण मरायला आलोंत काय ?" या श्रीसाईबाबांच्या शिकवणीचा उलगडा मागें केला आहे. या शिकवणीचा उपयोग काय, आणि फायदा काय ? अहो, आम्हीं अन्नान्नस्थितीला पोहोंचलों आहोंत ! दिवसांतून एक वेळ तरी पोटभर अन्न मिळेल काय याची भ्रांत. अशा स्थितीत "सोहं कोहं" या शिकवणीपासून सामान्य जनतेला उपयोग काय ? ( याचाही उलगडा प्रसंगविशेषीं श्रीसद्गुरु माउलीच्या स्फूर्तीनें होईल ) फारच थोडे ब्रह्मवेत्ते निर्माण होतात. असें आहे ना ?

ही गोष्ट अगदीं खरी आहे. पण ही ब्रह्मपदाची प्राप्ति ज्यांनीं अनुभवली अशाच पुण्यश्लोक विभूतींमुळें आज आपण हयात आहोंत. याच विभूतींची वचनें व स्मृति सध्यांच्या शोचनीय अवस्थेंतून आपणाला पुनः उच्चतम स्थितीप्रत नेतील यांत मुळींच शंका नाहीं.

श्री नागमहाशय या नांवाचे सत्पुरुष ढाक्का शहराजवळच्या एका खेड्यांत राहात होते. हे थोड्याच वर्षांमागें ब्रह्मीभूत झाले. श्री रामकृष्ण परमहंसाचे उत्तमांत उत्तम असे ते अनुयायी ते होते. अर्थात श्री विवेकानंदाचे ते गुरुबंधु होते. श्री नागमहाशयांना जसजसे त्यांच्या सद्गुरूकृपेनें पूर्ण अनुभव येत गेले, ऋद्धीसिद्धि त्यांच्या दासी बनल्या, तसेतसे ते विशेष विरक्त होऊन श्री भगवंताच्या प्रेमानंदांत तल्लीन झाले.

जसा बलवान् पहिलवान आपलें सामर्थ्य पूर्ण जाणून यःकश्चित मनुष्याबरोबर झुंज करण्यास बिलकुल उतरत नाहीं, तसा पूर्ण ब्रह्मवेत्ता आपलें स्वतःचें सामर्थ्य जाणून, तो तें इतरांना दाखविण्याच्या ( दांभिक प्रकाराचें ) कधींच प्रयत्न करीत नाहीं. इतकेंच नव्हे तर

जरी त्याच्या स्वतःच्या शरीराला कांही विकार झाला, जरी तो विकार दूर करण्यास तो पूर्ण सामर्थ्यवान असतो, तरी ती व्याधी नाहींशी करण्याच्या खटपटींत तो पडत नाही. स्वतःच्या देहावर त्याची इतकी सत्ता असते कीं, तो दुसऱ्याचे देहविकार आपल्या शरीरांत खुशाल ओढून घेतो, पण आपल्या स्वतःच्या शरीराविषयी त्याला पूर्ण अनास्था असते. अनंत-कोटि ब्रह्मांडाच्या नायकाबरोबर तद्रूप झाल्यामुळें त्याला स्वतःच्या देहाची किंचित्ही पर्वा नसते.देह कोणत्या क्षणीं सोडावा लागेल त्याची त्याला पूर्ण माहिती असते.

असो. जेव्हां स्वामी विवेकानंद पूर्ण विजयी होऊन अमेरिकेंतून हिंदुस्थानांत परत आले, त्या वेळीं श्रीनागमहाशयांना भेटण्याची त्यांना इच्छा झाली, आणि त्याप्रमाणें श्रीमहाशयना आधीं कळवून ते त्यांची भेट घेण्यास त्यांच्या गांवीं गेले. श्रीनागमहाशयांनीं त्यांना कडकडून प्रेमालिंगन दिलें. उभयतां बसल्यावर श्रीनागमहाशयांच्या अनुयायांनीं श्रीविवेकानंदांना हात जोडून प्रार्थना केली कीं, " आम्हाला दोन गोष्टी उपदेशाच्या सांगा. कारण आमचे महाराज आम्हाला कांहीं सांगत नाहींत. " हें ऐकल्याबरोबर श्री विवेकानंद अत्यंत विस्मयपूर्ण मुद्रेनें म्हणाले " अहो, तुम्ही यांची हीच किंमत केली ! यांच्या समोर मी काय सगूं शकेन ? यांची योग्यता इतकी थोर आहे कीं, यांच्या मनांतून जे विचारांचे ओघ निघत आहेत त्यांनीं तुमच्याच काय, पण सगळ्या जगाच्या विचारांची पालट होऊन योग्य तेंच वळण लागेल. "

ही गोष्ट सांगावयाचें कारण हें कीं, अशा थोर महात्म्यांच्या इच्छे-मुळेंच आज आपण हयात आहोंत. रोमन, ग्रीक, खाल्डियन, बाबिलोनियन, असीरियन वगैरे आणि अलीकडच्यापैकीं स्पानियर्ड—ज्यांना सुमारें अडी-चशें वर्षांमागें इंग्लंड थरथरां कांपत होतें तीं सर्व राष्ट्रें आज कोठें आहेत !

आपण आज हयात आहोंत हें केवळ ईश्वरावर आपला पूर्ण भरंवसा असल्यामुळें, आणि त्या प्रभुकृपेनें असे पूर्ण ब्रह्मवेत्ते आपल्या देशांत निर्माण

होऊन त्यांच्या आशीर्वादामुळें. जरी आजमितीला आपली स्थिति अशी झालावली आहे तरी या दैवी पुरुषांच्या कृपाछत्रामुळें आपली स्थिति सुधारून आपण पुनः उदयास येऊन झळकूं यांत संशय नाहीं.

श्री साईबाबांनीं यासाठींच "पुढें लई चांगले दिवस येतील" असें आश्वासन दिलेले आहे. ही कांहीं त्यांनीं लोणकढी थाप दिली नाहीं. त्यांचा शब्द कधीही मिथ्या होणार नाहीं याचा एक दाखला येथें देत आहे.

कांहीं वर्षांमागें एका अपूर्व पर्वणीचा योग आला होता. श्री नागमहाशयांच्या वडिलांच्या मनांत त्या वेळीं श्री भागीरथीमध्यें स्नान करण्याचा विचार आला. वृद्धापकाळानें शरीर थकलेलें, घरांत अठराविश्वे दारिद्र्य, आणि त्यामुळें मुलाच्या योग्यतेचा अनुभव नाहीं, अशी त्या म्हाताऱ्याची शोचनीय स्थिति झाली होती. मुलाची त्यानें पुनः पुनः विनवणी केली, पण त्याचें एकच उत्तर "पाहूं." शेवटीं म्हातारा त्रासून त्याला टाकून बोलला "तूं नास्तिक आहेस. इतकी माझी इच्छा तुला पूर्ण करतां येऊं नये ? कशाला नाड्या पोटीं आलास ?" महाशय कांहीं बोलले नाहीं. पर्वणीचा दिवस उगवला. दोन प्रहरी बारा वाजतां स्नानाचा योग होता. म्हातारा अगदी निराश आणि खिन्न झाला होता. दिवस मध्यान्ह होण्याच्या सुमाराला त्याच्या जागेच्या एका कोंपऱ्यांतून पाण्याचा एक प्रवाह सुरू झाला. आणि म्हणतां म्हणतां पाणी जोरानें निघून गांवातून वाहूं लागलें. श्रीनाग महाशय घराच्या मागल्या बाजूस एका मोडक्या पडवीत श्रीप्रभूच्या ध्यानांत निमग्न झाले होते. त्यांना हा प्रकार म्हाताऱ्यानें सांगितला. श्रीमहाशय तेथें धांवत आले. "जय मा तूं गरीबांवर कृपा केलीस ! जय गंगे ! जय भागीरथी ! धन्य तुझी लीला ! मा ! धन्य तुझी लीला !' अशी आरोळी करून डोळ्यांतून अश्रूंच्या धारा वाहत आहेत अशा प्रेमानंद स्थितींत साष्टांग नमस्कार करून श्रीभागीरथीच्या पवित्र जलाचें आपल्या माथ्यावर सिंचन केलें, आणि आपल्या वृद्ध पित्याला

श्रीभागीरथीच्या पाण्यांत स्नान करावयास सांगितलें त्याप्रमाणें त्यानें आणि गांवांतल्या सर्व लहानथोर स्त्रीपुरुषांनीं श्रीभागीरथीच्या नांवाचा जयघोष करून अत्यंत हर्षयुक्त उत्साहानें त्या श्रीभागीरथीच्या पवित्र जलांत स्नानें केलीं. आश्चर्याची गोष्ट ही कीं, तीन घटिका पर्वणीचा योग होता तोंपर्यंत हें पाणी वाहत राहिलें आणि नंतर तें बंद झालें. ही गोष्ट थोडयाच वर्षांपूर्वी घडली. हा प्रकार ज्यांनीं आपल्या डोळयांनीं प्रत्यक्ष पाहिला आणि अनुभविला असे बरेच स्त्रीपुरुष त्या गांवांत आहेत.

असाच प्रकार शिरडीस थोडया वर्षांमागें घडला. त्या वर्षी असाच कांहीं अपूर्व पर्वणीचा योग आला होता. कै. बापूसाहेब जोग आणि त्यांची पत्नी यांनीं कोपरगांवीं श्रीगंगेंत स्नान करण्याचें योजिलें. बापूसाहेब पर्वणीच्या आदल्या दिवशीं श्री सांईबाबांजवळ परवानगीसाठीं गेले. श्री म्हणाले, "बापूसाब ! बघुं त्याचा विचार उद्यां सकाळीं." बापूसाहेब म्हणाले, "बाबा, योग तर उद्यां सकाळीं सात वाजतांचा आहे आणि तो साधण्यासाठीं मोठ्या पहांटेस उठून चार वाजतां तरी इकडन निघाले पाहिजे." श्री म्हणाले "बापूसाब ! आपुन सकाळला बघुं" बापूसाहेबांनीं पुष्कळ प्रकारें विनवणी केली, पण बाबांचें एकच उत्तर "सकाळला बघूं." बापूसाहेबांची आणि त्यांच्या सुशील पत्नीची निराशा झाली. बाई म्हणे असा योग आयुष्यांतून एकदां येतो. पुनः यावयाचा नाहीं. पण बापूसाहेबांना श्री सांईबाबांच्या आज्ञेचें उल्लंघन करून जावत्रेना. उभयतांना तीं रात्र फारच अस्वस्थतेची गेलीं. ती रात्र बाबांच्या चावडीची होती. पहांटेस बापूसाहेब बाबांच्या कांकड आरतीला गेले. आरति संपते न संपते इतक्यांत गांवांत ओरड झाली कीं, शिवेच्या ओढयाला पाणी आलें. श्री सांईबाबा बापूसाहेबांना म्हणाले "बापूसाब, तूं सगळी रात्र मला लई शिया दिल्यास, पण देवाची दया, गंगा आपल्यापाशीं आली. जा, आतां आंघोळ करून घे." त्याप्रमाणें बापुसाहेब आणि त्यांच्या कुटुंबानें, आणि गांवांतल्या लहानथोर सर्व स्त्रीपुरुषांनीं गंगेच्या पाण्यांत स्नानें केलीं.

पाट बांधून तयार होत होते. अजून पाणी सोडण्याला दोन चार महिन्यांचा अवकाश होता. गंगेचें पाणी इतक्यांत येईल हें कोणाच्याही स्वप्नी नव्हतें. पण त्या रात्रीं पुष्कळ कोस दूरवर कोठचा बंधारा एकाएकी फुटला आणि शिरडीच्या शिवेच्या ओढयांत गंगेचें पाणी त्या दिवशीं पर्वणीच्या वेळी आलें. नंतर तो फुटलेला बंधारा दुरुस्त करण्यांत येऊन, योजिल्या वेळेप्रमाणें दोन चार महिन्यांनीं श्रीगंगेचें पाणी रीतसर सोडण्यांत आलें.

त्या दिवशीं दोन प्रहरीं आरतीच्या वेळीं बापूसाहेब सकाळीं घडलेल्या चमत्काराविषयीं सद्गदित वाणीनें बोलत असतां बाबा म्हणाले, "अरे बापूसाब, देव किनई लई कनवाळू आहे रे, आपुणच त्याच्यावर भरंवसा ठेवीत नाहीं आणि सबुरी पकडत नाहीं. हा "सबुरी" शब्द श्रींच्या मुखांतून लेखकानें अनेक वेळां ऐकलेला आहे. सबुरी म्हणजे सतत, न ढळणारी निश्चित श्रद्धा.

सन १९१० सालीं सप्टेंबर महिन्यांत जेव्हां लेखकाला श्री सांई बाबांचें पहिल्यानदा दर्शन झालें, त्या वेळीं एका विहिरीच्या पाण्यावर याचे फक्तची भिस्त असे. त्या वेळींचे श्रींचे बोल लेखकाला स्पष्ट आठवतात. ते हे कीं, "अरे, गंगा आपल्या पायांपाशीं येईल." ह्या शब्दांचा त्या वेळीं कांहीं उलगडा झाला नाहीं. त्यानंतर कांहीं वर्षांनीं सर्व्हे वगैरे होऊन नंतर सरकारनें मंजुरी देऊन गंगेचें पाणी अडवून पाटांत सोडण्यांत आलें. सन १९१० सालीं ज्यांनीं कोपरगांव आणि शिरडीमधला आठ मैलांचा रुक्ष प्रदेश पाहिला होता त्यांना पाटाच्या पाण्यानें याच प्रदेशामध्यें किती तरी फेरफार होऊन उंसाचीं आल्हादकारक शतें आज दिसत आहेत, आणि श्रीसांईबाबांच्या भाकिताची साक्ष पटवीत आहेत.

सर्व भक्तांचा चरणरज

"म्हातारा"

रा. रा. म्यानेजर साहेब, श्रीसांई लीला यांचे सेवेसीं.

रामराम वि. वि. सद्गुरु श्रीसांईबाबांच्या अतर्क्य सामर्थ्यानें मज-सारख्या सर्व तऱ्हेनें अपंग मनुष्यास या त्रिविध तापानें सतत युक्त संसारांत अगदीं आणीबाणीच्या प्रसंगीं सहारा कसा दिला गेला व इन्क्युअरेबल म्हटल्या जाणाऱ्या व्याधीसही त्यांच्या अमानुष सामर्थ्यानें कसें बरें केलें त्याबद्दल मला आलेला अनुभव मी सेवेसीं पाठवीत आहे. त्यास श्रीसांई लीलेंत योग्य स्थान मिळेल अशी आशा आहे.

मी जातीचा मराठा असून उमरावतीचा राहाणारा अहे. शिक्षण साधारण लिहिणेंवाचणें इतकेंच झालें असल्यानें चरितार्थाकरितां मोटर ड्रायव्हरचें काम शिकून उदरनिर्वाह करीत असतों.

उमरावतीचा एक सावकार कांहीं मोटरी सजावदपासून खरगोण रोडवर चालवीत असल्यानें त्यानें मला बरोबर आणलें व त्यायोगानें मला खरगोणास दररोज जाण्याचा मोका मिळाला.माझ्या भाग्यानें खरगोणास गणेश केशव रेगे रिटायर्ड अमीन साहेबांचे भेटीचा व समागमाचा मला अलभ्य लाभ झाला. ज्या ज्या वेळीं मी त्यांना भेटत असे त्या त्या वेळीं मोठ्या प्रेमानें व कळकळीनें संसारांत कसें वागावें, ईश्वराच्या ठिकाणीं निष्ठा कशी ठेवावी व तसें केलें असतां काय परिणाम होतो या विषयावर दोन गोष्टी सांगून श्रीसमर्थ सांईबाबांचे अनुभवही सांगत असत. असा क्रम बरेच दिवस सारखा सुरू होता, व त्यायोगें त्यांच्या ठिकाणीं माझी पूज्य बुद्धि कायम होऊन मी त्यांना माझ्या जन्मदात्या बापाहूनही अधिक मान देऊं लागलों, व तेही पोटच्या लेंकराप्रमाणें माझ्यावर प्रेम करूं लागले, व माझें कल्याण होईल असा लौकिक व पारमार्थिक उपदेश करीत आहेत. माझ्या गरीबीमुळें द्रव्याची यत्किंचितही मदत नसतांही त्यांच्याच मध्यस्थीनें खरगोण येथील एका गरीब, पण सुशील बाईचे मुलीशीं माझा विवाह झाला. पुढें मोटर ड्रायव्हरीचे दररोजचे दगदगीचे कामामुळें म्हणा किंवा माझ्या पूर्व संचिताने म्हणा, मला एकाएकीं लेप्रसीचा उद्भव झाला. मी दवाखान्यांत

बरेच महिने औषधोपचार केले, परंतु लेप्रसी हा असाध्य रोग आहे असे डॉक्टरसाहेबांचे म्हणणें पडलें. नुकतेंच लग्न झालेलें, घरांत माझा धाकटा भाऊ अज्ञान बारा वर्षांचा, व उदर निर्वाह तर मोठार चालविण्यावर अवलंबून. बिमारीमुळें माझ्या हातापायांवर सूज आल्यानें मोटर हांकणें कठीण झालें व लखेरीस ती नोकरी सोडावीही लागली. मजला वस्तुकाम न झाल्यानें माझे मालक वाणीबुवानीं आपल्या प्रकृतिगुणाप्रमाणें पैसा देणें बंद केलें व सरते शेवटी मला माझी पत्नी व धाकटा भाऊ यांच्यासमवेत माझ्या मोलमजुरीनें निर्वाह करीत असलेल्या सासूचाच आश्रय करावा लागला. त्या बाईनें आम्हा सर्वांचा चरितार्थ अगदीं निष्काम बुद्धीनें व अनेक अडचणी सोसून मोठ्या धैर्यानें चालविला खरा. परंतु माझी दिवसेंदिवस बिघडत चाललेली स्थिति पाहून आतां पुढें काय होईल हा प्रश्न नेहमी डोळ्यापुढें उभा राही व मी मूढ होऊन बसें. अशा मनःस्थितींत असतांना एके दिवशीं मी माझ्या उद्विग्न विचारांना कंटाळून दुःखाचा थोडा परिहार व्हावा या हेतूनें सदरी पेन्शनर जमीन साहेब--ज्यांना आम्ही सर्व "काकासाहेब" म्हणतों त्यांच्याकडे गेलों. त्या वेळीं ते श्रीमत् भगवत् गीतेचा पाठ करीत बसले होते. त्यांच्या घरीं गेल्यावर मी त्यांना नमस्कार केला व त्यांनीं मजकडे मोठ्या प्रेमदृष्टीनें पाहातांच मला रडूं येऊं लागलें. माझी अशी दीन दशा पाहून त्यांनीं मला म्हटलें कीं, "संपतराव, घाबरूं नको, धीर सोडूं नको. तुझी बिमारी लौकिकदृष्ट्या असाध्य ठरली असली तरी परमेश्वरास कांहीं असाध्य नाहीं." असें सांगून त्यांनीं आपले संकटाचे दिवस व त्यांतून श्रीसाईबाबांनीं कसकशी सुटका केली ह्याबद्दल सविस्तर हकीकत समजावून आतां तूंही अनन्यभावानें बाबांचे पाय धर असा उपदेश केला. समर्थांचा एक फोटो देऊन त्याची दररोज एकाग्र मनानें पूजा करीत जा व तीर्थ घेत जा म्हणजे बाबा तुझ्या संकटांतून तुला बाहेर काढतील. विश्वास ठेव व धीरानें काम कर असें मोठ्या गोड शब्दानें मला सांगितलें. त्यांच्या उपदेशाप्रमाणें मी सर्व भार बाबांवर टाकून त्यांची मनाभावानें सेवा सुरू केली. तों काय चमत्कार झाला कीं, आठ दहा दिवसांचे आतच मला खबर लागली कीं, महेश-

रास एकजण ह्या बिमारीवर खैरात औषध देत असतो. हें ऐकून मी त्या सद्-गृहस्थाकडेस गेलों. व त्यांस प्रकृति दाखविली. त्यानें मजकडेस पाहून उत्साहपूर्वक सांगितलें कीं, बेटा घाबरूं नकोस. सतत एक महिना माझें औषधाचें सेवन कर व पथ्य सांभाळ, मुदतीचे आंतच तूं बरा होशील. हे शब्द ऐकतांच मला आनंदाश्रु लोटले व मी त्यांचे पायांवर लोळण घेतली. त्याचेंही अंतःकरण द्रवलें, व त्यानें लगेच औषधाची योजना सुरू केली. औषध मीं एक महिना सतत घेत होतों. महिना अखेरीस तो गृहस्थ मुदाम महेश्वराहून खरगोणास आला, व माझी प्रकृति पाहिली व म्हणाला कीं, बेटा तुझा रोग बरा झाला आहे. आतां मात्र माझ्या औषधाचा उतार देतों तो घे व कांहीं काळजी करू नको. ईश्वरानें माझे हातास यश दिलें हें पाहून मला संतोष होत आहे. बाद त्यांचे आज्ञेप्रमाणें मी उतारही घेतला. व आतां मी पूर्ववत्प्रमाणें अगदीं गतव्याधी झालों आहे व कामावर रुजूही झालों आहे. सारांश काय कीं, माझ्यासारख्या दीनाच्या विपन्न अवस्थेंत त्या दीन दयाळ सांई माउलीलाच दया येऊन त्यांनीच संकटांत धांव घेऊन माझें रक्षण केलें. नाहींपेक्षा माझी इहलोकयात्रा बहुतेक संपलीच होती. ह्या माझ्या अनुभवावरून भगवंतानीं गीतेंतील तेराव्या अध्यायांत उत्तम, मध्यम व कनिष्ठ अधिकाऱ्याहूनही मदंतर अधिकाऱ्याचाही उद्धार करतों असें साक्षात् वचन देऊन " अन्येत्वेवमजानन्तः श्रुत्वान्येभ्य उपासन ॥ तेऽपि चाति तरन्त्येव मृत्युं श्रुतिपरायणाः ॥ ह्या मंत्रानें साधारण मनुष्याच्या तरणोपायाचा मार्ग घालून दिला आहे. त्या मंत्राचें एकाग्र चित्तानें अनुष्ठान केलें असतां समर्थ सर्वज्ञ सर्वाधार व भक्त कनवाळू प्रभु कधींही भक्ताची उपेक्षा करीत नाहीं हें सिद्ध होत आहे. त्या सर्वांतर्यामी सर्वेश्वरास तन-मन-धन अर्पण करून त्याची कृपा भाकून मी आपली रजा घेतों. लोभ असावा हे विनंती.

श्रीसाईचरणरज

संपतराव देशमुख

मोटारड्रायव्हर

वरील अनुभवासंबंधानें श्रीयुत जी. के. रेपे पेन्शनर अमीन खरगोण होळकर स्टेट यांजकडे तपास करितां त्यांच्याकडून खरगोणहून ता. २-१०-२९ रोजीं प्रत्युत्तर आलेल्या पत्रांतील उतारा:—

"त्यास महारोग उद्भवला त्या वेळीं त्याच्याकरितां मी डॉक्टर लोकांची बरीच खुशामत केली, परंतु रोग असाध्य, आमचा इलाज नाही असा जबाब मिळाल्यानें अखेर मीच त्याला श्री समर्थांचे पाय धरण्यास सांगितलें व त्या दीनदयाळ माउलीनें त्यास संकटांतून मुक्तही केलें. बाबांचे मला वेळोवेळीं जे अनुभव आले त्यांपैकीं कांहीं मी साईलीलेंत दिलेच आहेत व अजूनही त्यांच्या अजब लीलेचे चमत्कार घडत आहेत ते साईलीलेंत प्रसिद्ध होऊन भक्तांचे अंतःकरणांत भक्ति जागृत राहावी अशी माझी भावना आहे.

**रा. आ. तर्खड,**

—संपादक.

## श्रीसाईसमर्थ

पूर्वी घरांतल्या मंडळीजवळ नेहमीं उद्गार काढत असे कीं, जर मला श्रीबाबांच्या कृपेनें नोकरी लाभली तर मी पहिल्या पगारांतून श्री बाबांची दक्षणा व शिर्डीस जाण्याचा खर्च करीन. पुढें १९१७ सालांत मला २५ रुपयांवर नोकरी मिळाली व पहिल्या पगारांतून प्रथम श्रीबाबांस देण्यास दक्षणा रुपये २० व रुपये १५ श्री शिर्डीस जाण्यास असें ठरविलें पुढें श्री शिर्डीस जाण्यास कोणाबरोबर जावें हा प्रश्न उभा राहिला व त्या वेळेस अंधेरीचे कै. बेंद्रेमास्तर आमच्या गांवांतल्या शाळेंत हेडमास्तर होते. त्यांनीं मला श्री शिर्डीस जावयाचें आहे. जर आपणांस यावयाचें असल्यास माझी चांगली सोबत होईल. व मी त्यांच्याबरोबर दादरवरून ४ च्या पॅसेंजर गाडीनें जाण्याचें ठरविलें. तो विचार मी आमच्या घरांत कळवून श्री शिर्डीस जाण्यास दुपारीं निघालों माझा जाण्याचा विचार झाला असें पाहून माझ्या मोठ्या बहिणीस फार वाईट वाटले.ती म्हणूं लागली कीं,आपण श्री बाबांची

सारखी भक्ति करीत असतांना श्री बाबांनी तुला व शिर्डीस जाण्याचा योग आणला व मला आणूं नये ही एक आश्चर्याची गोष्ट आहे व आपण श्री बाबांच्या फोटोजवळ अश्रु ढाळीत बसली.तें पाहून मला फारच वाईट वाटलें व मी तिला म्हणालों मी एकदां श्रीबाबांचे दर्शन घेऊन आलों म्हणजे सबडीप्रमाणें घरांतील प्रत्येकास श्रीशिर्डीस नेऊन बाबांचें दर्शन करवीन. तरी पण तिची समजूत होत नाहीं तेव्हां माझ्या आईनें उसने पैसे घेऊन तिला माझ्याबरोबर जाण्यास सांगितलें व आम्ही दोघें व कै. वेंद्रे मास्तर, त्यांचें कुटुंब व आमच्या शेजारच्या गांवची एक वृद्ध लोहारीणबाई असे श्री शिर्डीस निघालों व दुसरे दिवशीं सकाळी दहा वाजतां श्रीशिर्डीस पोंचलो. त्या वेळेस श्रीबाबा श्री लेंडीवर जाण्यास निघाले होतें. तेव्हां आम्हीं तावडतोब आमचें सर्व सामानसुमान कै. दीक्षितांच्या वाड्यांत ठेवून त्या दर्शनाचा लाभ घेतला. नंतर स्नान आटोपून श्रीबाबा मशिदींत बसले होते त्यांच्या दर्शनास गेलों. मशिदींत भक्तमंडळींची बरीच गर्दी असल्यामुळें कै. वेंद्रे व मला बसण्यास जागा नव्हती म्हणून आम्हीं श्रीबाबांच्या समोर उभे राहिलों. तेव्हां कै. बुटी साहेबांनीं श्रीबाबांच्या जवळ तंबाखूची चिलमी भरून ती त्यांच्या हातांत दिली व त्यांनीं तिचा एक झुरका मारून ती माझ्याकडे नजर लावून मला देऊं लागले. माझी ही प्रथम शिर्डीची खेप असल्यामुळें मला ती त्यांच्या हातांतून घेणें प्रशस्त वाटलें नाहीं. व मी त्यांना सांगितलें. बाबा मी लहान असल्याकारणानें तंबाखू ओढत नाहीं. तेव्हां त्यांनीं आपला हात मागें घेऊन इतर भक्तमंडळींस आळीपाळीनें दिली. अंमळशानें श्रीबाबांनी मजकडे दृष्टि लावून १० रुपये दक्षणा मागितली व ती मी वाड्यांत जाऊन श्रीस आणून दिली. नंतर त्यांनीं कै. वेंद्रेकडून घेतली व नंतर माझी बहीण बायकांत बसली होती तिजकडून मागितली व पुनः मजकडून मागितली व मी त्यांची ठरविक रक्कम त्यांस आणून दिली. पुढें आम्हीं वाड्यांत गेल्यानंतर आमचा परत घरीं जाण्याचा हिशोब तपासून पाहातों तो आम्हांस थोड्या पैशांचो तूट पडत होती व आम्हीं श्रीशिर्डीत नवीन असल्याकारणानें भक्तमंडळीची

चांगलीशी ओळख झाली नव्हती. तेव्हां आम्हांस मोठा विचार पडला. नंतर आम्ही कै. बेद्रे मास्तरांस थोडे उसने पैसे देण्याचें विचारिलें. तेव्हां ते म्हणाले मी माझ्याबरोबर जास्त पैसे आणले नाहींत उलट मी श्रीबाबांच्या दक्षणेच्या पैशांतून श्रीशिर्डीस आलों. नंतर आमच्याबरोबर जी वृद्ध लोहारीण बाई आली होती ती म्हणू लागली कीं, अहो आपण श्रीबाबांच्या चरणांजवळ आलों असतां अशी कां काळजी करतां. तेव्हां आम्हीं सर्व हकीकत तिला निवेदन केली.व ती म्हणू लागली,अहो,श्री बाबांची तुमच्यावर पूर्ण कृपा आहे म्हणून श्रीबाबांनी तुमच्याकडून दक्षणा मागितली माझ्यावर कृपा नाहीं म्हणून माझ्याजवळून एक पै सुद्धां दक्षणा घेतली नाहीं.त्यांनीं तुम्हांस येथवर आणलें आहे तेच तुम्हांस घरीं सुखरूप नेतील त्याबद्दल आपण काळजी करूं नये. तुम्हांस पैशाची अडचण पडल्यास तुम्ही मजकडून घ्या व घरीं गेल्यानंतर आपल्या सवडीप्रमाणें माझे पसे परत करा. हे त्या बाईच्या तोंडून उद्गार निघतांच आम्हांला मोठा आनंद झाला व श्री बाबांच्या लीलेचें कौतुक वाटलें.

रात्रीं जेवणखाण आटोपल्यावर श्री बाबांचीं मशिदींतून चावडीवर निघण्याची तयारी चालली होती व भक्तमंडळी आपआपल्या मित्रमंडळीस बाबांच्या सेवेकरितां चवऱ्या, चामरें व पंखे वगैरे देत होती. तेव्हां माझ्या मनांतून श्री बाबांच्यावर चवरी, चामरें किंवा पंखे यांतून कांहीं तरी एक वस्तु टाळण्याचें होतें;पण मला ती कोणाजवळून मागून घेण्याचा धीर होईना. व आपण ह्या बाबांच्या सेवेला मुकणार, कारण माझी ती प्रथम वेळ असल्याकारणानें माझी कोणाबरोबर चांगलीशी ओळख नव्हती. माझ्या मनांत अनेक विचारांनीं खळबळ उडाली इतक्यांत श्रीबाबांनी माझ्या मनांतला हेतु जाणून एक भक्त आपोआप माझ्याजवळ एक चवरी देऊन आपण श्रीबाबांवर चवरीचा ढाळतां काय ? असें विचारून चालता झाला. तें पाहून मला आनंद वाटला. व श्रीबाबा सर्वज्ञ आहेत व आपल्या लेकरांचीं वेळोवेळीं कोडकौतुकें कशीं पुरवितात याचा पूर्ण अनुभव आला.

आनंदराव परशुराम डोळस

मी दरसाल श्रीशिर्डीस उत्सवाला कै. गोविंद रघुनाथ दाभोळकर व रा. रा. रघुवीर भास्कर पुरंदरे यांच्याबरोबर जात येत असतों व श्री-शिर्डीस सुखरूप पोंचल्याचें व निघण्याचें पोष्ट कार्ड घरीं पाठवीत असतों. १९२३ सालांत पावसाळ्याचे दिवसांत माझें कुटुंब बाळंतीण असतांना मी उत्सवास गेलों व तेथून मी अमुक दिवशीं अमुक वेळेस येण्याचा कार्ड घरीं पाठविला असतांना कांहीं कारणामुळें कै. अण्णासाहेब दाभोळकर व पुरंदरे यांचा निघण्याचा बेत आम्हीं ज्या दिवशीं निघणार त्याच्या थोडा वेळानें झाल्यामुळें मला पत्रांत लिहीलेल्या वेळेप्रमाणें घरीं येतां आलें नाहीं व घरची मंडळी काळजी करूं लागली व मनांत नाना तऱ्हेचे विकल्प आणूं लागली कीं,हल्लीं पावसांत श्रीगोदावरीस जास्त पाणी झालें असेल कीं काय अशी काळजी करूं लागली व माझें कुटुंब दुपारीं जेवण झाल्यानंतर विचार करीत असतां तिला झोंप लागली व तिनें खालीं लिहिल्याप्रमाणें स्वप्नपाहिलें:—

आमच्या गांवापैकीं एक वृद्ध ब्राह्मण आपल्या बरोबर एक १४-१५ वर्षांचा तेजस्वी मुलगा घेऊन आमच्या दारांत उभा राहून माझ्या आईस हांक मारून म्हणाला कीं, आपण आपल्या मुलाची काळजी करण्याचें कांहीं कारण नाहीं, तो आमच्या येथें कांहीं परक्या ठिकाणीं नव्हता. तो चांगला सुखरूप होता असें म्हणून त्या मुलास पुढें करून आईस म्हणाला, हा घ्या तुमचा मुलगा असें म्हणून आपण अदृश्य झाला.

इतक्यांत माझें कुटुंब जागें होऊन पाहूं लागलें तों स्वप्नांतील ब्राह्मण व तो मुलगा देखील नाहीं व त्याच दिवशीं संध्याकाळीं मी श्रीशिर्डीहून घरीं आलों.

( २ )

श्रीबाबा समाधिस्थ होण्याच्या आदले दिवशीं माझ्या मोठ्या बहिणीनें पाहिलेलें स्वप्न:—

" मी श्रीशिर्डीस गेलों व परत आलों तेव्हां फक्त श्रीबाबांचा प्रसाद आणला व तीर्थ आणलें नाहीं. तेव्हां बहीण माझ्यावर रागावली. "

दुसऱ्या दिवशीं श्रीबाबा समाधिस्थ झाले ही आम्हांस बातमी लागली.

आ. प. डोळस.

माझे वडील आपल्या मिळकतींतून दरमहिन्यास दरुपयास पंच आगाप्रमाणें धर्मफंड म्हणून कांहीं रक्कम काढतात त्याप्रमाणें मी नोकरीस लागल्यावर माझ्या मिळकतींतून कांहीं तरी रक्कम श्रीबाबांच्या नांवानें निराळी काढून ठेवीत असे. पुढें ती रक्कम श्रीशिर्डीस बाबांस कशी पोंचेल ही मला रात्रंदिवस काळजी होती व मी श्रीबाबांजवळ आपल्या नांवानें काढलेली रक्कम आपण कोणत्याना कोणत्या रूपें आमच्याकडून आपणांस मिळेल असा मार्ग दाखवावा अशी प्रार्थना करीत असे.त्या वेळीं कै. गोविंद रघुनाथ दाभोळकर व कै. हरी सिताराम दीक्षित यांचा माझ्याबरोबर चांगली ओळख नव्हती. ते फक्त वरचेवर श्रीशिर्डीस जात येत असत एवढें माहीत होतें अशा विचारांत बरेच दिवस लोटल्यावर मी एके दिवशीं रात्रीं मेलचें काम आटोपून चर्चगेट स्टेशनवर ८-२० च्या गाडीनें ऑफिसमधून घरीं परत येत असतांना कै. दाभोळकर त्याच गाडीनें पार्ले येथें कै. दीक्षितांकडे कांहीं कारणास्तव जातांना माझे डब्यांत येऊन माझ्या शेजारीं बसले; तरी पण त्यांची माझी ओळख नसतांनाः मी त्यांस गाडींत नमस्कार केला व त्यांची ओळख करून घेतली व त्यांना श्रीबाबांच्या नावानें काढलेल्या रक्कम श्रीशिर्डीस बाबांकडे कशी रवाना होईल व दुसरी बरोच माहिती पर्ले स्टेशन येईपर्यंत विचारून घेतली व त्यांनीं मला योग्य सल्ला देऊन श्रीशिर्डी संस्थानची सर्व बातमी दिली व श्रीसाईलीलेच्या सभासदांच्या वर्गणीदारांबद्दल वगैरे सांगितलें अशा रीतीनें मी श्रींचे कृपेनें सामान्य वर्गणीदार होऊन तेव्हांपासून प्रत्येक उत्सवास त्यांच्या व रा. रा. पुरंदरे यांच्याबरोबर श्रीशिर्डीस जात येत होतों. आतां ऑफिसच्या कडक कायद्यामुळें मी दर रामनवमीच्या उत्सवास जातों व अशा प्रकारें श्रीबाबांनीं माझ्या सर्व अडचणी दूर केल्या व पुढेही करतील अशी मी रात्रंदिवस त्यांच्याजवळ प्रार्थना करितों.

कांदिवली, } आपला नम्र,
आ. प. डोळस.

श्री दासगणुकृत

अर्वाचीन

# श्री भक्तलीलामृत

ॐ श्रीगणेशाय नमः । श्रीसरस्वत्यै नमः । श्रीभवानीशंकराय नमः । श्रीरमारमणाय नमः । श्रीगुरुभ्यो नमः । श्रीगुरु प्रल्हाद-राजाय नमः । श्रीगुरु वामनाय नमः । श्रीकवीश्वराय नमः । जय-जयाजी मोरेश्वरा । दयानिधे योगेश्वरा । कृपा करी गा दातारा । दासावरी सत्वरी ॥ १ ॥ जयजयाजी गजानना । जयजयाजी मूषकवाहना । जयजयाजी विघ्नकंदना । गौरीपुत्रा दयानिधे ॥ २ ॥ तूं ऋद्धिसिद्धींचा नायक । तूं कलिमलाचा विध्वंसक । तूं दीनांचा कल्पतरु देख । उपेक्षीना सर्वथा ॥ ३ ॥ तुझ्या पदा शरण रिघतां । विघ्नें भस्म होती तत्त्वतां । अगाध असे तुझी सत्ता । वर्णूं न शके दास गणू ॥ ४ ॥ तूं कविजनांचें माहेर घर । तूं सुबुद्धीचा सागर । तूं मुमुक्षूंचें मानस सरोवर । धांव वेगें लवलाहीं ॥ ५ ॥ जयजयाजी विधिकन्यके । भक्तप्रिये भक्तपालिके । हे त्रिभुवनसुंदरी अंबिके । पाव वेगें सरस्वती ॥ ६ ॥ तूं आदिमाया प्रणवरूपिणी । तूं जगत्-याची स्वामिणी । हे श्वेतवसने हंसवाहनी । अंत माझा पाहूं नको ॥ ७ ॥ अंबे तुझें पाहतां वदन । लज्जित झाला रोहिणीरमण । तव स्वरूपाचें करितां ध्यान । तटस्थ होती सर्व ऋषी ॥ ८ ॥ माते तुझा अगाध महिमा । अगम्य असे निगमागमा । निज भक्त तेसी आरामधामा । साह्य करिसी तयांचें ॥ ९ ॥ तुज वर्णितां भुवनसुंदरी । शिणले ते वेद चारी । तेथें माझा काय तरी । पाड असे सांग

जननी ॥ १० ॥ तुझी कृपा होतां पूर्ण । पंगू उल्लंघी गिरीद्रगुहन । [illegible] । भक्त जाण । अंधशास्त्र पाहतसे ॥ ११ ॥ तूं शब्दसृष्टीची ईश्वरी । सकळ सिद्धि तुझे करीं । माझे हेतू पूर्ण करी । हेचि मागणें गणूचें ॥ १२ ॥ तवं मम मुखीं वास करावा । मम मुखें ग्रंथ वदवावा । ही सज्जनांची घडो सेवा । तव कृपें माझ्या करें ॥ १३ ॥ जयजयाजी उमावरा । भक्तहृदयानंदकरा । मायातीता सर्वेश्वरा । पंचवदना विरूपाक्षा ॥ १४ ॥ जयजयाजी दक्षमखविध्वंसका । जयजयाजी पदास्पजनका । जयाजयाजी कामांतका । भवानीशा गंगाधरा ॥ १५ ॥ तूं निर्गुण निराकार । तूं एक वस्तूपर । तूं पूर्णब्रह्म साचार । गुणत्रय रहित तूं ॥ १६ ॥ तूं ॐकाररूप परमेश्वर । तव ठाईं न ते पडूविकार । तूं एक जगदाधार । जगद्गुरु जगदात्मा ॥ १७ ॥ बाल्य तारुण्य वृद्धावस्था । तुज नाहीं उमानाथा । जागृति सुषुप्ति विरहिता । एक तूंच असशी ॥ १८ ॥ स्थावरजंगमादि सर्व कांहीं । दृश्य ज्ञेय वस्तू पाहीं । सामावलया तुझे ठायीं । तव वेगळें कांहीं नसे ॥ १९ ॥ तुज वर्णितां वेद शिणले । तत्त्ववेत्ते योगी भागले । परी न तुझें स्वरूप कळलें । जगदोद्धारा विश्वंभरा ॥ २० ॥ तेथें मी अल्पमती । केवीं वर्णू तुजप्रती । तव विराट्रूपा निश्चिती । जाणण्या मी अज्ञ असें ॥ २१ ॥ यास्तव तुझ्या ज्या साकार विभूती । त्याच मा स्तवितों पशुपती । तव अर्भक मी निश्चितीं । माझी उपेक्षा करूं नको ॥ २२ ॥ जयजयाजी भालनेत्रा । भवभवांतक त्रिपुरदहना । विश्वनाथा करुणाघना । पावं वेगं गणूसी ॥ २३ ॥ पुराणपुरुषा असुरांतका । भयशोषणा अशिवहारका । जगन्निवासा शिवदायका । कृपा कीजे गजवरी ॥ २४ ॥ केदारेश्वर तुझें नाम । तूं योगियांचा विश्राम । निजभक्तांचा कल्पद्रुम । असशी तूं सर्वथा ॥ २५ ॥ हे शूली सोमनाथा । महाकाळ कालातीता । ॐकारा शैलजामाता ।

त्र्यंबकेशा पाव वेगें ॥ २६ ॥ हे भर्गा भीमाशंकरा । वैजनाथा त्रितापहरा । मल्लिकार्जुना धृष्णेश्वरा । रामेश्वरा जगद्वंद्या ॥ २७ ॥ हे कृष्णातटविहारा । मम आराध्यदैवता कोटेश्वरा । शिंप्यापुरनिवासिया शंकरा । ग्रंथ करवीं संपूर्ण हा ॥ २८ ॥ जेवीं लहान मुलाप्रति । गुरु हस्त धरोनि लिहवीती । तेवीं करीं गा उमापती । ग्रंथ जिहवीं मयकरें ॥२९॥ तूं मन्मनीं करी वास । ग्रंथ व्हवीं हा सुरस । विघ्न ना होवो कधीं यास । हेंचि मागणें गणूचें ॥ ३० ॥ जयजय भीमातटनिवासी केशवा । पूर्णब्रह्मानंदा रमाधवा । संतादिकांचा विसांवा । तुजविणें कवण असे ॥ ३१ ॥ जयजय वैकुंठनिवासी लक्ष्मीवरा । पीतवसनाशार्ङ्गधरा । गजास्यजनक प्रियकरा । महाराजा समर्था ॥ ३२ ॥ जयजयाजी सच्चिदानंदा । राधाधरमधुलिंदा । आनंदकंदा गोविंदा । नरकांतका मुरारे ॥ ३३ ॥ जयजयाजी कृपाघना । कोमलांगा राजीव नयना । आजानबाहो सुहास्यवदना । मम इच्छा पूर्ण करी ॥३४॥ या भक्तलीलामृतग्रंथा । मी होय आजी रचिता । परि हा पूर्ण कीजे अनंता । लाज माझी राखणें ॥ ३५ ॥ हे औदुंबरनिवासी दत्तात्रया । नमन माझें तुझे पायां । वेळ ना कीजे वर द्यावया । वाट पाहे दास गणू ॥ ३५ ॥ जयजयाजी महामंगला । मोहिनीशा विश्वपाला । तुझे चरणीं ठेवितों भाला । माझी इच्छा पूर्ण करीं ॥ ३७ ॥ तूं कृपेचा कृपाघन । तूं सच्चिदानंद नारायण । इच्छित माझें मज देऊन । सखी करी गणूसी ॥ ३८ ॥ तूं जरी मातें उपेक्षीसी । तरी मी प्रार्थूं कवणासी । परम समर्था कृपाराशी । ग्रंथ करवी संपूर्ण हा ॥ ३९ ॥ हे सज्जनगडस्थ समर्था । श्रीरामदासा पुण्यवंता । धरून लेंकराचे हाता । नेई पैल तटासी ॥ ४० ॥ जयजय श्रीपुरनिवासी गुरुराजा । प्रल्हादराज महाराजा । धांवें पावें भक्तकाजा । उपेक्षीना सर्वथा ॥ ४१ ॥

इतलामपुरकर कुलभूषणा । ज्ञानार्णा ज्ञानघना । पंडितवर्या श्रीरामकृष्णा ।
कीजे कार्य संपूर्ण हें ॥ ४२ ॥ तूं जननीजनिता सद्गुरु । तूं
माझा कल्पतरु । तूं करुणेचा सागर । कृपादृष्टीनें अवलोकिजे ॥४३॥
आतां वंदूं सरस्वती । ज्यांचे ठायीं वसे सरस्वती । ते व्यास वाल्मीकि
प्रभृति । वंद्य मातें सर्वदा ॥ ४४ ॥ तैसे गीर्वाण भाषाकवि । कालि-
दासादि बाणभट्ट । जयांची काव्यशक्ति अचाट । ते सर्व मी वंदितो
॥ ४५ ॥ आतां प्राकृत कवीश्वर । तुकारामादि ज्ञानेश्वर । मुद्दंदराज
कबीर । आनंदतनय पंतपंडित ॥ ४६ ॥ आतां वंदूं जननिजनिता ।
जीं मज दैवते तत्त्वतां । तयांचिया चरणीं माथा । ठेवितां कार्यसिद्धि
होय ॥ ४७ ॥ आतां वंदन श्रोतयांप्रती । तुम्हीं सज्जन परिस
निश्चिती । मी लोह हीनजाती । ममता हेय करावें ॥ ४८ ॥ हा
भक्तलीलामृतग्रंथ कल्पद्रुम । भक्तलीला हीं फलें उत्तम । पद्यरूपा
हीं शोभायमान । पर्णें साच तयाचीं ॥ ४९ ॥ यागें महिपती नामें
कवीश्वर । त्यांनीं रचिला ग्रंथ सुंदर । नाम भक्तिविजय साचार ।
महती थोर तयाची ॥ ५० ॥ त्या भक्तिविजय ग्रंथांतरीं । येवोनि
गेले नानापरी । तारक जे कां भवसागरीं । ऐसे थोर महात्मे ॥५१॥
त्या मी येथें समग्र कथा । जरी झालों आज वर्णिता । तरी होईल
विस्तार ग्रंथा । ह्मणोनि ध्वनितार्थ बोलतों ॥ ५२ ॥ जयदेवस्वामी
परम पावन । गीतगोविंदें स्तविला नारायण । मृत भार्या उठविली
जाण । थोर महती तयाची ॥ ५३ ॥ वाल्मिकि पुनरपि जन्मास ।
होवोनि आला तुळसीदास । जन लाविले रामभक्तीस । असंख्य
पतित तारिले ॥ ५४ ॥ शुक झाला कबीर । ज्याचा विणकरी
शार्ङ्गधर । खेला विणोनि सुंदर । दिधलासे कबीरामती ॥ ५५ ॥
निवृत्ती ज्ञानदेव सोपान । मुक्ताबाई गुणनिधान । हीं चार भावंडें
गुणखाणी । प्रभो ईश्वर अवतरली ॥ ५६ ॥ रेड्यामुखें वेद वदविले ।

निजांव मिरीस चालविलें । चांगदेवाचें गीपण हरिलें । ज्ञानेवें रचिली ज्ञानेश्वरी ॥ ५७ ॥ चंद्रभागेचिया तटीं । महावैष्णव दामाशेटी । तयास शिंपल्याचे पोटीं । नाना रत्न सांपडलें ॥ ५८ ॥ ज्यानें हरितें आपुलें केलें । नागनाथाचें देऊळ फिरविलें । अलौकिक अभंग रचिले । पतितोद्धारा कारणें ॥ ५९ ॥ थोर पंगू कूर्मदास । निजांगें गेला पंढरीस । सावत्यानें जगन्निवास । उदरामाजी घांटविला ॥ ६० ॥ गोरा तेरढोकीकर । राका कुंभार गुर्जर । दोघेही भक्त थोर । करतलस्थ फोड हरीचे ॥६१॥ जगमित्र नागा सज्जन । जयातें व्याघ्ररूप धरोन । शार्ङ्गधरें दिधलें दर्शन । कृतार्थ केलें जयाला ॥ ६२ ॥ जोगाप्पा चोखादासी जनी । सेना रोहिदास महाज्ञानी । नरसीमेहता गुर्जर वाणी । महा वैष्णव सुरदास ॥ ६३ ॥ मिराबाई कान्होपात्रा । विदित असे कीं सर्वत्रां । शेख महंमद झाला त्राता । भवार्णवीं बुडत्यातें ॥ ६४ ॥ प्रतिष्ठानीं एकनाथ । झाला भगवद्भक्त विख्यात । जयाचे घरीं रावत । श्रीखंड्या होऊनी श्रीहरी ॥ ६५ ॥ मंगळवेड्यांत वैष्णव वीर । पंतदामाजी कृपासागर । जयाकारणें झाला महार । जगद्गुरु जगदात्मा ॥ ६६ ॥ सद्गुरु स्वामी जनार्दन । तैसाच भानुदास गुणनिधान । रामदास वैराग्यखाण । समर्थ जन म्हणती जया ॥ ६७ ॥ तुकाराम साधु देहूकर । केवळ वैराग्यसागर । भक्तांमाजी अग्रेसर । आवडे हरीतें प्राणाहुनी ॥ ६८ ॥ धन्य धन्य तो बोधला । भक्तमालेंत हिरा शोभला । कीर्तनरंगीं सजीव झाला । नाचूं लागला आनंदें ॥ ६९ ॥ चंद्रभागा भरली अपार । यात्रेस आले संतोबा पवार । देव होयोनियां मगर । यात्रा नेली पैलतीरा ॥ ७० ॥ ऐशा संतांलागूनी । मागें वर्णिलें महिपतीनीं । भक्तिविजय ग्रंथ करोनी । अमृत पाजिलें सकळिकां ॥ ७१ ॥ निंबराज महाराज देऊणकर ।

जया स्वर्गी परमेश्वर । वैसतसे कमलावर । भक्तवत्सल श्रीहरी ॥७२॥
यास्तव आतां वाचिरहित । जे झाले भगवद्भक्त । तयांतें मी नमितों
येथ । सकुटुंबें तयांच्या ॥ ७३ ॥ ज्यांच्या कथा पुण्यकारक ॥
पापतापदैन्यहारक । मुमुक्षूतें मोक्षदायक । कल्पतरू कामुकांच्या
॥ ७४ ॥ ते संत केवळ चिंतामणि । ज्यांचा आज्ञांकित चक्रपाणी ।
ज्यांच्या दर्शनें करोनी । महापापें भस्म होती ॥ ७५ ॥ ज्यांनी
षड्रिपु जिंकिले । तैसेंच मीतृपण टाकिलें । मोक्षाचें भांडार लुटिलें ।
जें कां दुर्लभ इतरांप्रती ॥ ७६ ॥ किंवा जे भवार्णवीचि नौका ।
अथवा स्वर्गीचे सोपान देखा । प्रिय जे कां जगन्नायका । प्राणाहुनी
अत्यंत ॥ ७७ ॥ सिताबेदरे ऐक आतां । अर्वाचीन भक्तकथा ।
आपणां या उभयतां । कृतार्थ बेडे करतील ॥ ७८ ॥ आतां श्रोते
सावधान । पुढीलाध्यायीं कथेचें अनुसंधान । हा नमनाध्याय झाला
पूर्ण । कृपाकटाक्षें शंकराच्या ॥ ७९ ॥ ही दास गणूची आर्त
वोली । सद्गुरुजे तुम्हीं गोड केली । कृपेची करणें सांउली । दासावरी
सर्वदा ॥८०॥ हा भक्तलीलामृत ग्रंथ महातिथी । भक्तलीला ही भागी-
रथी । संतांतां मनेच्छा पूर्ण होती । प्रथमोऽध्याय गोड हा ॥ ८१ ॥

॥ श्रीहरिहरार्पणमस्तु ॥ शुभंभवतु ॥

श्रीगणेशाय नमः ॥ तूं जगाची चिच्छक्ति । तूं विश्वंभर विश्वमूर्ति । तूं सूत्रधार निश्चितीं । तुझ्या नाटका न वर्णवे ॥ १ ॥ जेवें वेदासही पडला विचार । तेवें मी किमी अज्ञान पोर । दिधीनें कां सागर । उपसवेळ दयाळा ॥ २ ॥ ऐसा तूं परम अचिंत्य । नाहींस म्हणावें परि न उचित । कां कीं क्षणाक्षणा साक्ष येत । तुझ्या असणेपणाची ॥ ३ ॥ ऐसा जो जगदाधार । परम दयाळू सर्वेश्वर । तो कृपा करो माझेवर । दीनानाथ दीनबंधु ॥ ४ ॥ त्याच प्रभूच्या कृपेनें । मी हें करितों बोलणें । त्याच प्रभूच्या सत्तेनें । लिहितसें मी या ग्रंथा ॥ ५ ॥ अहमदनगर जिल्ह्याभीतरीं । गोदा-भीमेच्या मध्यंतरीं । तालुका असे राहुरी । थडी पुला प्रवरेची ॥६॥ ऐशा त्या तालुक्यांत । ताहराबाद गांव सत्य । जेथील कुलकर्णी विख्यात । कांबळे उपनांव जयांचें ॥ ७ ॥ जे शाकल शाखेचे ब्राह्मण । ऋग्वेदी आश्वलायन । त्या कुलकर्णीवंशी जाण । जन्म पावले महिपती ॥ ८ ॥ महिपती आपुले पित्याला । ज्ञातारपणा-माजी झाला । शके सोळाशें सदतीसाला । ताहराबादेमाझारीं ॥ ९ ॥ महिपती स्वरूपें सुंदर । दुसरा पंचबाण मन्मथशर । तारुण्य अव-स्थेंत साचार । करूं लागला कुळकर्ण ॥ १० ॥ स्वरूपसंपत्ती ज्यापाशीं । तो बहुधा निघे विलासी । आत्मज्ञान वा सद्भक्तीसी । विरळा सुंदर ओळखी ॥११॥ ऐसा नव्हता महिपती । पूर्ण निष्ठा धर्मावरती । भूतदया जागृत अति । होती ज्याच्या मनामध्यें ॥१२॥ नित्य रुक्मिणीपांडुरंगाची । पूजा करी प्रेमें साची । जहागिर सगुण उपासनेची । मेळविली जयानें ॥ १३ ॥ धन्य धन्य ती सगुणभक्ती । सेव्यसेवकभाव जागृती । रहातसे प्रेमामती । भरती येत चित्तांत॥१४॥ ऐशी भक्ति ज्याचे हाता । आली तोच धन्य तत्त्वतां । पुढे तोच पूर्णत्वा ।-प्रती जातो निश्चयें ॥ १५ ॥ असो एके दिनीं महिपती ।

बसले अतां पूजेप्रती । आला चपरासी शीघ्रगती । बोलाविण्या तयांस ॥ १६ ॥ चपरासी म्हणे महिपतीस । आतांचे आतां कचेरीस । चला पाचारिलें तुम्हांस । महालकऱ्यांनीं येथ धाडलां ॥ १७ ॥ महिपती म्हणती ते अवसरीं । येतों पूजा झालियावरी । आपण थांबा तोंवरी । कृपा करा साईवर ॥ १८ ॥ तें न मानी चपरासी । दुसरें बोले बहुवसी । आतांच नेईन कचेरीसीं । तुजला ही कुळकर्ण्यी ॥ १९ ॥ महिपतीचा निरुपाय झाला । नमन करून देवाला । दप्तर घेऊन कचेरीला । गेले चपराशाबरोबर ॥ २० ॥ काम होतें तें सारिलें । महिपती स्वगृहा आले । विठ्ठला पुढें उभे ठेले । बाप आपुला लाणोनी ॥ २१ ॥ हे पंढरीशा रमारंगा । भवभयभंगा पांडुरंगा । आदिअनादि मतापतुंगा । श्रीविठ्ठला विश्वपते ॥ २२ ॥ पदरीं वृत्ती कुळकर्ण्याची । म्हणून राहिली पूजा साची । अतां तरी या किंकराची । देवा उपेक्षा करूं नको ॥ २३ ॥ कानांत होती लेखणी । ती ठेवून विठ्ठलचरणीं । प्रतिज्ञा केली महिपतींनीं । त्रासून आपल्या वृत्तीला ॥ २४ ॥ आजपासून देवदेवा । मी न करीं राजसेवा । लेखणी करीं केशवा । न धरीं या वृत्तीस्तव ॥ २५ ॥ पुढेंही सात पिढ्यांपर्यंत । कोणी न कुळकर्ण करावें सत्य । आग लागो त्या वृत्तीप्रत । परमार्थीं विघ्न करणारी ॥ २६ ॥ ऐसी प्रतिज्ञा करून । महिपती झाले विदेही पूर्ण । अखंड करिती नामस्मरण । रुक्मिणीपती विठ्ठलाचें ॥ २७ ॥ बहुत वेळ लोटविले घर । मानून संसार क्षणभंगुर । चित्त झालें बहुत आतुर । परब्रह्म साधावया ॥ २८ ॥ एके दिनीं तुकोबा स्वप्नांत । बोलले त्या महिपतीप्रत । त्वां संतचरितें गावीं सत्य । जगदोद्धार करावया ॥ २९ ॥ वेदांनीं केला विचार । कैसा कोण परमेश्वर । तत्प्राप्तीचे प्रकार । पुराणांनीं प्रसिद्ध केले ॥ ३० ॥ पुढें कालचक्र फिरलें । गीर्वाण भाषाभिमा

श्री

यशोदापांडुरंगी या नांवाच्या टीकेसहित

# केकावलि.

सदाश्रितपदासदाशिवमनोविनोदास्पदा ।
स्वदासवशमानसाकलिमलांतकाकामदा ॥
वदान्यजनसद्गुरोप्रशमितामितासन्मदा ।
गदारिदरनंदकांबुजधरानमस्तेसदा ॥ १ ॥

## प्रस्ताव.

या प्रथम श्लोकांत सारीं नामें भगवद्गुणविशिष्टविशेषणात्मक व संबोधनात्मक आहेत, अतएव शिष्टकविसंप्रदायानुरूप ही केका केवळ मंगलाचरणात्मिका अशी जाणिली पाहिजे. हा मूलग्रंथ मुख्यत्वें कृष्णस्तुतिपर असल्यानें ही वैष्णवी स्तुति मानिली असतां बाध येणार नाहीं. त्यांत प्रथमतः भगवंताचे भक्तवात्सल्य-शरणागतदुरितनिवारकत्वादि जे भक्तजनांस अत्यंत इष्ट गुण तेच उद्देशून मोरोपंत कवि स्तुतीस आरंभ करतात. त्यांत ते प्रथमतः या पहिल्या केकेंत प्रार्थनापूर्वक नमस्कार समर्पितात. परंतु कोणाचीहि प्रार्थना कर्तव्य असतां ज्याची प्रार्थना करावयाची, त्याचें अव्यवहित अवधान प्रार्थकानें आपल्याकडेस लावून घेणें हें प्रथम कार्य असें जाणून मोरोपंत या केकेंत भगवंतास संबुद्धीनें म्हणजे हांक मारून अत्यंत विनयतेनें नमस्कार करितात.

## टीका

पदान्वयः—सदाश्रितपदा, सदाशिवमनोविनोदास्पदा, स्वदासवशमानसा, कलिमलांतका, कामदा, वदान्यजनसद्गुरो, प्रशमितामितासन्मदा, गदारिदरनंद-कांबुजधरा ते सदा नमः

सदाश्रितपदा,—हे सदाश्रितपदा,-सत् म्हणजे साधु नारदादि, त्यांनीं-आश्रित आहेत पद म्हणजे पाय ज्याचे असा तूं;-तुझ्या पायांवांचून दुसरें शरण्य अथवा समाधानस्थान नाहीं, त्यांच्या आश्रयणावांचून दुसरा कोणताही तरणोपाय नाहीं, असा पूर्ण निश्चय करून नारदकपिलव्यासवाल्मीकादि जे महाज्ञानी झाले त्यांनींहि त्यांचाच आश्रय केला;-येणेंकरून भगवद्भक्ति हाच काय तो ज्ञानाचा

परिपाक, हेच काय तें ज्ञानाचें मुख्य आश्रयस्थान, पुष्कळ बुद्धिमान् पुरुषांची बुद्धि अस्थिर होत्साती सैरावैरा धांवती, परंतु शेवटीं ती भगवद्भक्तींतच विश्राम पावती, पुष्कळांचे ज्ञानतरंग या भवसागरीं नानारूपांनीं प्रकटित होतात, परंतु ते अनेक घोटाळे खावून शेवटीं तुझ्या भक्तीशिवाय दुसरें तीर बघल्यानें तेथेंच लीन होणें त्यांस प्राप्त होतें, असा येथील गूढार्थ जाणावा; काय अर्थ पुढल्या विशेषणांनीं स्पष्ट करून दाखविला आहे. कदाचित् आपण पुसाल कीं, माझ्या भक्तीच्या प्रेमांत असा कोण विघ्न आहे ? त्यास, मानवांची सर कथा काय सांगावी, परंतु सर्व देवगणांत श्रेष्ठ, जो आपल्या मस्तीतला, असा महेश, त्याच्याहि आनंदाचें स्थान आपणच अहां, अशी आशंका निवारित होत्साते कवि पुढलें विशेषण देऊन म्हणतात,—सदाशिवमनोविनोदास्पदा,—हे सदाशिवमनोविनोदास्पदा,—सदाशिव-महादेव, त्याचा जो-मनोविनोद-मनाचा हर्ष, त्या हर्षाचें-आस्पद-स्थान-कारण-आद्यमूल तूं आहेस; तुझाच महिमा मनांत आणून हर्षयुक्त होत्साता शिव तांडव करितो. अथवा, सदाशिव--तमोगुणोद्भव जगत्संहारकर्ता कालात्मक कालभैरवरूप जी व्यक्ति, तिचा-मनोविनोद-मनोविलास-जगत्संहारस्वरूप मनो-

---

१ महात्मानस्तु मां पार्थ दैवीं प्रकृतिमाश्रिताः ।
भजन्त्यनन्यमनसो ज्ञात्वा भूतादिमव्ययम् ॥

भ. गी. अ. ९, श्लो० १३

सततं कीर्तयन्तो मांयतन्तश्चदृढव्रताः ॥
नमस्यन्तश्च मां भक्त्या नित्ययुक्ता उपासते ॥

—श्लो० १४

आलोड्य सर्वशास्त्राणि विचार्य च पुनः पुनः ।
इदमेकं सुनिष्पन्नं ध्येयो नारायणः सदा ॥

महाभारतेव्यासोक्तिः

तुका म्हणे सार दृढ पाय धरावे ॥

—तुकाराम.

बोलणेंचि नाहीं आतां देवावीण कांहीं ।
एकसरें केला नेम देवा दिल्हे कोधकाम ॥
पाहेन ते पाय जोंवरि हे दृष्टिचाय ।
तुका म्हणे गर्वे हेचि संकल्प वहाणें ॥

—तुकाराम.

व्यापार इ० त्याचें-आस्पद-स्थान-कारण-मूलप्रेरणा, एतद्रूप असा तूं; अर्थात् त्वां प्रेरणा केली आहे, त्वां अधिकार दिला आहे, म्हणूनच कालभैरव या जगताचें संहरण करितो, त्या प्रेरणेवांचून इतकें महत्कार्य करण्यास तो केवल असमर्थ असा ध्वन्यर्थ जाणावा. अथवा या विशेषणांत **सदा**-निरंतर, हें पद निराळें काढून, **शिवमनोविनोदास्पदा** असें एक पद केलें तथापि सांगितल्या सर्व अर्थांची योजना तशीच राहून अर्थापत्तिही तशीच होते, म्हणून इष्ट असल्यास तशी योजना करावी. कदाचित् आपण म्हणाल कीं, सदाशिव तर आमच्याच त्रयींतला, माझीच मूर्ति आहे, तेव्हां त्याच्या मनोविनोदाचें कारण मीच आहें यांत कांहीं आश्चर्य नाहीं; परंतु त्याहून इतरांस मी वश होतों कीं काय या आशंकेचें निवारण करित होत्साते कवि पुढलें विशेषण देतात.-**स्वदासवशमानसा**,-हे स्वदासवश-मानसा, **स्वदास**-आपले सेवक-भक्त प्रल्हादअजामिळादि, त्यांस-**वश**-अनुकूल-आधीन आहे-**मानस**-अंतःकरण, ज्याचें असा तूं; जे अनन्यभावेंकरून तुला शरण येतात, या भवसागरांतून पार उतरविण्यास तुजवांचून दुसरा कोणी समर्थ नाहीं असें समजून जे तुझीच कांस धरून तुझ्या भजनीं लागतात, त्यांसच तूं वश होतोस, आणि त्यांचे मनोरथ पूर्ण करतोस, अशीं तुझींच वचनें प्रमाण आहेत.

---

१ भागवतांत भीष्मानें कालमाहात्म्य सांगितलें आहे;—

सर्वंकालकृतंमन्येभवतांचयदप्रियं ।
सपालोयद्वशेलोको वायोरिवघनावलिः ॥
स्कं. १, अ. ९, श्लोक १४.

भागवतांत कपिलमुनीनें देवहूतीस भक्तियोग सांगितला आहे त्यांत कालमाहात्म्य वर्णिलें आहे;—

रूपभेदास्पदंदिव्यं कालइत्यभिधीयते ।
भूतानांमहदादीनांयतोभिन्नदृशांभयम् ॥
स्कं. ३, अ. ९, श्लो. २९

योऽतः प्रविश्यभूतानिभूतैरत्त्यखिलाश्रयः ।
सविष्णवाख्योऽधियज्ञोऽसौकालःकलयतांप्रभुः ॥
स्कं. ३, अ. २९, श्लोक ३८.

२ मय्यर्पितमनोबुद्धिर्यो मे भक्तः स मे प्रियः ।
भ. गीता अ. १२, श्लो. १४.

अनन्येनैव योगेन मां ध्यायन्त उपासते ।
तेषामहं समुद्धर्तामृत्युसंसारसागरात् ॥
भ. गी. अ. १२, श्लो ६-७.

कदाचित् आपण म्हणाल कीं, पापापासून अलिप्त असून चुकीस्तःकरण होऊनमी जे मला शरण येतात, त्यांसच मी वश होतों, तुजसारिखे जे पापग्रस्त आहेत त्यांजकरतां कांहीं अनुग्रह करीत नाहीं; त्यांत, हें सत्य आहे, तथापि पापी मनांचें पाप दूर करण्याचेंहि सामर्थ्य आपलेंच आहे; आपणावांचून दुसरें कोणीहि करण्यास इतर कोणी समर्थ नाहीं; पापग्रसित जे आम्हीं केवळ अशक्त जीव, त्या आम्हांस इतक्या महच्छत्रूंच्या हातांतून सोडवून मग अनुग्रह करणारे आपणच, याप्रमाणें आशंका निवारित होत्साते कवि पुढलीं दोन विशेषणें देऊन म्हणतात:— कलिमलांतका, कामदा;—हे कलिमलांतका, हे कामदा, कलिमल—पाप, त्याचा-अंतक—अंत करणारा—नाश करणारा, असा तूं; येथें अंतक या शब्दावें पापाचें शत्रुत्व ध्वनित होतें, पापरूप जो आमचा महान् शत्रु त्याचा नाश करणारा तूंच आहेस; आणि असा त्याचा नाश केल्यावर मग-कामदा, काम—मनोरथ-इच्छा, यांतें देणारा, असा तूंच: निर्मलांतःकरण जे तुझे शरणागत भक्त त्यांचे सर्व मनोरथ परिपूर्ण करणारा तूंच आहेस, म्हणूनच तुला भक्तकामकल्पद्रुम असें म्हणतात. परंतु येथें 'काम' म्हणजे ऐहिकराज्यादिभोगेच्छा असा अर्थ कोणी मनांत आणील, अथवा आपले सेवक किंवा याचक यांचे मनोरथ पूर्ण करणारे कर्णादि दाते पुराणप्रसिद्ध आहेतच, मग 'कामद' या विशेषणानें विशेषार्थापत्ति ती कोणती अशी आशंका घेईल, तर तसें न व्हावें या हेतूस्तव, अथवा आपल्या अभिप्रेतार्थास दार्ढ्य यावें या हेतूस्तव, कवि पुढलें विशेषण देऊन म्हणतात- वदान्यजनसद्गुरो,—हे वदान्यजनसद्गुरो, वदान्यजन—उदारजन—कर्णप्रभृति जे महान् विख्यात दातेजन, त्यांचा-सद्गुरु स्वामी—आचार्य, असा तूं; त्या सर्वांस औदार्याविषयीं उपदेश तुझा आहे, तुझ्या प्रेरणेवांचून उदार जनांची औदार्यकर्मा-दिषयीं प्रवृत्ति असंभवनीय, म्हणून सर्व दातेजनांचा तूं आचार्य आहेस; अतएव त्या सर्वांत तूं अत्यंत श्रेष्ठ होस, तुजपरता दुसरा वदान्य कोणी नाहीं असा अर्थ. (येथें जें 'सद्गुरो' म्हणोन संबोधनाचें रूप आहे, तें संस्कृत व्याकरणाच्या नियमाप्रमाणें). [पूर्वपक्ष] जर मी अशा सर्व वदान्य जनांत श्रेष्ठ आहें, आणि मजपरता दुसरा कोणी दाता नाहीं, तर मग लोक मला शरण येऊन माझा अनुग्रह संपादण्याकरितां कां भजत नाहींत? असें कदाचित् आपण पुसाल तर, यांत महाराज आपल्या वदान्यत्वास किमपि बाध न येतां उलटें यांत अशा लोकांचेंच

नाऽहं वसामि वैकुंठे योगीनांहृदयेरवौ ।
मद्भक्तायत्रगायंति तत्र तिष्ठामि नारद ॥

१ स्युर्वदान्यस्थूललक्ष्यदानशौंडावदुन्नदे ।

—अमर:

दौर्भाग्य तर काय सांगावें ! परंतु अहंकारजन्य पतित्वाहि उपलब्ध होतें. तथापि याहि पतित्वापासून उद्धार करून त्यांजवरहि अनुग्रह करणार आपण्च, अशा अर्थाची विवक्षा करित होत्साते कवि पुढलें विशेषण देतात.-प्रशमिता-मितासन्मदा.-हे प्रशमिता-मितासन्मदा, प्रशमित-शांत झालें आहेत, अमित-पुष्कळ, असे जे-सन्मद्-गर्व-अहंकार इ०, ज्याणें असा तूं. (अथवा येथें शमित हें असत् या पुढा शब्दाचें विशेषण न करितां असन्मद् या संयुक्त शब्दाचें विशेषण करून कर्मधारय समास केला तरी चालेल; अथवा असत्मद् येथें षष्ठीतत्पुरुष न करितां कर्मधारय केला तरी चालेल. परंतु उभय-पक्षी अर्थास किंचित् गौणत्व येतें म्हणून वरचा पक्ष विशेषार्थवान् जाणून घेतला आहे ). सर्व बहुन्यजनांत श्रेष्ठ, अतएव अत्यंत कारुणिक जो तूं त्या तुला शरण न जातां हिरण्यकशिपुरावणकंसचाणूरादि जे जे आपल्या गर्वांत राहिले, त्या त्या असंख्य मदोन्मत्त जनांचा तो गर्व त्वांच शमविला; अर्थात् त्यांच्या दातीं तृण देऊन शरणागत करून त्यांस आपलें दयापात्र त्वांच केलें. या शेवटल्या पदानें तर सोरोपंतानें भगवंताचा पतितपावनत्व म्हणून जो अत्यंत कारुण्यरूप गुण, त्याचें वर्णन करून दाखविलें असें समजावें. [ पूर्वपक्ष ]-बरें जसें त्वां आतां माझें वर्णन केलें तसा जर मीं आहें, तर मग ते ते गुण दाखविणारीं चिन्हें माझ्या अंगीं कोठें आहेत ? अशी आशंका कवि म्हणतात कदाचित् आपण घ्याल, तर महाराज तीं चिन्हें कोठें आहेत म्हणून काय पुसतां, तीं तर आपण आयुधरूपेंकरून निरंतर धारण करितां, याप्रकारें आशंकेचें निवारण करित होत्साते कवि शेवटलें विशेषण देऊन नमस्कार करितात.-गदारिदरनंदकांबुजधरा,-हे गदारिदरनंद-कांबुजधरा, गदा-प्रसिद्ध, अथवा शुद्ध मराठी पर्याय म्हटला म्हणजे सोटगा, अरि-चक्र, दर-शंख आणि नंदक-आनंद करणारें असें जें-अंबुज-कमल यांतें धरा-धारण करणारा असा तूं त्याचें संबोधन. विष्णूच्या खड्गाचें नांवहि नंदक असें आहे[2], त्यातें धारण करणारा, असा अर्थाचीहि प्रसिद्धि असेल, परंतु तसा अर्थ केला असतां प्रसिद्ध जी शंखचक्रगदापद्मधारी चतुर्भुजात्मक विष्णुमूर्ति[3],

---

१ शंखभृन्नंदकीचक्रीशार्ङ्गधन्वागदाधरः ।
रथांगपाणिरक्षोभ्यः सर्वप्रहरणायुधः ॥
वि. स. नाम. श्लो. १०७

२ कौमोदकीगदाखड्गो नंदकः कौस्तुभोमणिः । —अमर

३ चतुरात्माचतुर्व्यूहश्चतुर्दंष्ट्रश्चतुर्भुजः ।
चतुर्मूर्तिश्चतुर्बाहुश्चतुर्व्यूहश्चतुर्गतिः ॥
वि. स. नाम. श्लोक ८२

तिच्या हस्तसंख्येहून ही आयुधसंख्या एकाधिक होऊन त्या अवशिष्ट राहिलेल्या आयुधास निराधारत्व येऊं पाहातें, म्हणून येथें नंदक हें पुढल्या अंगुष्ठ शब्दाचें विशेषण मानावें म्हणजे या आशंकेचें निवारण होईल असें मला वाटतें. वरकड सर्वशक्तिमान् अशा भगवंताच्या हस्तादावयवांची नियमितसंख्यात्व कल्पना करून तेथें बुद्धीस अटकवून ठेवणें हा अज्ञानमूलक ममोव्यापार होय; कारण तो परमेश्वर अनंतहस्त, अनंतपाद, अनंतनेत्र, असा आहे[1]; म्हणून आपल्या भक्तजनांचे संकट निवारण्याकरितां, अथवा आपला प्रभाव व गौरव प्रगट करण्याकरितां, अथवा सद्धर्म संस्थापण्याकरितां, जेव्हां जेव्हां हीं पंचायुधें धरण्याचा त्यास प्रसंग येतो, तेव्हां तेव्हां पांच हात प्रगट करून त्यांनीं तीं धारण करणार नाहीं असेंहि संभवत नाहीं; अशी कल्पना केल्यावर मग नंदक हें विशेषण न करितां त्याचा अर्थ खड्ग सुखानें मानावा. अथवा पंचायुधें धरण्याचा एककालिक प्रसंग मनांत न आणितां कार्यपरत्वें एका एका आयुधाचें धारण तत्तत्प्रसंगीं विवक्षित मानिलें, व असें मानण्यास कांहीं बाध येतो असेंहि नाहीं, तर मग पंचहस्तांचीहि कल्पना करण्यास अवकाश न देतां चतुर्भुजातून

१ विश्वतोबाहुरितिश्रुतेः ।

नमोस्त्वनंतायसहस्रमूर्तयेसहस्रपादाक्षिशिरोरुबाहवे ।

वि. स. नाम. श्लोक १३२

अनेकबाहूदरवक्त्रनेत्रं पश्यामि त्वां सर्वतोऽनंतरूपम् ॥

भ. गी. अ. ११, श्लो. १६

क्रोधहाक्रोधकृत्कर्त्ता विश्वबाहुर्महीधरः ।

वि. स. नाम. श्लो. ३४

हरिंसहस्रशिरसंसहस्रचरणेक्षणम् ।
सहस्रबाहुमुकुटंसहस्रवदनोज्वलम् ॥

भी. स्तवराज श्लो. २५

पश्यंत्यदोरूपमदभ्रचक्षुषा सहस्रपादोरुभुजाननाद्भुतं ।
सहस्रमूर्धश्रवणाक्षिनासिकं सहस्रमौल्यंबरकुंडलोल्लसत् ॥

भागव. प्र. स्कं., अ. ३, श्लोक

तुकोबानेंहि म्हटलें आहे.

रूप दावि कांरे आतां । सहस्र भूजांच्यामंडिता ।

एकानें पांचव्या खड्गाचेंहि धारण सुकर होतें. अथवा येथें कमलाचें अधिष्ठान हस्त न मानितां जर विष्णूची नाभि मानिली, तर मग पूर्वोक्त आशंकेस अवकाश न राहातां विष्णूचें चतुर्हस्तांनीं नंदकादि चतुरायुधांचें धारकत्वहि अबाधित राहातें; आणि असें मानण्यास विष्णूचें पद्मनाभ म्हणून जें प्रसिद्ध नाम आहे तेंच प्रमाण.[1] येथें आणखी सूक्ष्म विचारानें पाहिलें असतां असें दिसतें कीं, गदादि पंचायुधांचें जें येथें कवीनें विधान केलें आहे, तेंहि यथासंख्य परंतु युक्तमानें, म्हणजे पूर्वोक्त **प्रशमितामितासन्मदादि** अव्यवहित एका मागें एक अशा पांच विशेषणांनीं सूचित जीं भगवद्गुणोल्लसित कार्यें त्यांच्या साधनास अनुकूल असें आहे. पाहा–अमित असन्मदातें प्रशमित करणारी अशी **गदा** होय. कारण, मद म्हणजे अहंकारमूलक मनोविकार, याच्या ठायीं निरंतर उन्नतीची भावना असते, म्हणूनच मदोन्मत्त पुरुषाची मान निरंतर वर राहाते, त्याचें प्रशमन म्हणजे अधःपतन करण्यास, म्हणजे त्यास खालीं पाडण्यास योग्य साधन म्हटलें म्हणजे गदा होय; द्रव्य, कुल, ज्ञान, वैभव, इत्यादिकांचा अभिमान धरून कोणी उन्मत्त झाला कीं, त्याच्या मस्तकावर भगवंताची गदा पडून तिनें त्यास खालीं पाडिलेंच असें समजावें. **वदान्यजनसद्गुरु** या विशेषणानें भगवंताच्या सद्बुद्धि-प्रेरकत्वगुणाचा अथवा भक्तसंकटनिवारकत्वगुणाचा अथवा भक्तवरदत्वगुणाचा बोध होतो, तेव्हां तत्कार्यसाधनास योग्य **अरि** म्हणजे चक्र होय. अर्थात् त्याचें सुदर्शन होय[2]. तसेंच तिसरा **कामदत्वरूप** म्हणजे भक्तमनोरथपरिपूरकत्वरूप जो भगवद्गुण तत्प्रसिद्ध्यर्थ **दर** म्हणजे शंख हें दीर्घ आणि गंभीर असा घोष

---

१ नमोऽस्तुपद्मनाभाय ।

ग. मोक्ष. श्लोक ६५

नाभिप्रजातकमलासनसंस्तुताय ।

ग. मोक्ष. श्लोक ७०

अजस्यनाभ्यांसंभूतं यस्मिन्विश्वंप्रतिष्ठितं ।
पुष्करंपुष्कराक्षस्य तस्मैपद्मात्मनेनमः ॥

भी. स्तवराज, श्लोक. ६१

२ गजेंद्रमोक्षांत विष्णुस्तुतींत भगवंतास "**भक्तिप्रियायवरदीप्तिसुदर्शनाय**" असें म्हटलें आहे. एथें **वरदीप्ति** हें सुदर्शनाचें विशेषण योजिलें आहे. वर म्हणजे भक्तांस इष्ट जी सद्बुद्धिप्रेरणरूप क्रिया, तदुत्पन्न जी **दीप्ति** म्हणजे अंतःप्रकाश, तद्रूप असें आहे सुदर्शन ज्याचें.

करणारें आयुध असल्यानें योग्य साधन होय: परमकारुणिक भगवान् विष्णु या आयुधानें सर्व जनांस कळवितो कीं, जे अनन्यभावेंकरून मला शरण येतात, त्यांचे सन्मनोरथ परिपूर्ण करण्यास मी समर्थ आहें; अथवा माझ्या भक्तांस जे छळितात त्या दुष्टांचा नाश करून त्या भक्तांस आश्रय देणारा मीच आहें; हें प्रस्फुट करण्यास्तव त्याचें पांचजन्यधारकत्व समजावें. ज्या काळीं भीष्मकृपाचार्यांसारखे प्रचंड योद्धे आपले अधिपति असल्यानें सगर्व झालेली अशी कौरवांची महत्सेना पांडवांनीं पाहिली, आणि तिच्या दर्शनेंकरून जेव्हां अर्जुन भ्याला, त्या काळीं कृष्ण त्याचा सारथि असतां त्यानें आपला पांचजन्य फुंकला; असें करण्याचा हेतु हाच दिसतो कीं, येथें पांडवांस अभय द्यावें, आणि तेथें दुर्योधनादि उन्मत्त वीरांस सुचवावें कीं, यद्यपि पांडव दुर्बल आहेत, तथापि यांचा रक्षिता मी भगवान् कृष्ण आहे, अतएव इष्ट जी विजयलक्ष्मी ती मी आपल्या आश्रितांसच देणार, हें तुम्हीं सारे पक्केपणीं समजा. **कलिमलांतक** या विशेषणेंकरून पापाचें शत्रुत्व दर्शविलें आहे म्हणून पूर्वीच सांगितलें, तेव्हां शत्रुवधार्थ **नंदक** नामें खड्ग म्हणजे तलवार हेंच आयुध योग्य होय. तसेंच **स्वदासवशमानस** या विशेषणानें असें इंगित होतें कीं, भक्तीनेंच भगवदंत:करणाची प्रसन्नता होते, म्हणून ती प्रसन्नता दाखविण्याकरितां **अंबुज** म्हणजे कमल यांचें धारण प्रशस्त होय; कारण, अंत:करणाची प्रसन्नता आणि कमलाची प्रफुल्लता यांचें विकाशनधर्मत्वेंकरून साधर्म्य उपलभ्यमान होतें. तेव्हां अशा विशेषणांनीं विशिष्ट जो तूं त्या-ते **सदा नमः**-ते[1]-तुला, **सदा**-निरंतर, **नमः**-नमस्कार असो. याप्रमाणें कवि शेवटीं या गीर्वाण पदेंकरून भगवंतास नमस्कार करितात.

---

तसेंच भक्त गजेंद्र जेव्हां भगवंतानें मकरापासून मुक्त केला, तेव्हां त्याचें संकटनिवारणरूप कार्य, तेंहि भगवंतानें आपल्या चक्रानेंच केलें.

जलस्थंदारयामासग्राहंचक्रेणमाधवः ।
मोचयामासनागेंद्रंप्राणेभ्यःशरणागतम् ॥

गजेंद्रमोक्ष, श्लोक ९७

भीष्मपर्वांत भगवंतास म्हटलें आहे:—

एह्येहिदेवेशजगन्निवासनमोस्तुतेशार्ङ्गगदासिपाणे ।
प्रसह्यमांपातयलोकनाथरथादुदग्राद्भुतशौर्यसंख्ये ॥

तुकारामानेंहि म्हटलें आहे;—

पडतां जडभारी दासीं आठवावा हरी ।
मग तो होऊं नेदी शीण आड घाली सुदर्शन ॥

१ हें युष्मन् शब्दाचें चतुर्थीचें रूप.

ही पहिली केका मंगलाचरणात्मिका असल्यानें महामायोपाधिकहरिहरादि-भगवदवतारपर न लावितां केवळ तदुपाधिरहित सच्चिदानंदरूपपरब्रह्मपर लाविली असतांहि लागायाजोगी आहे, असें माझ्या बुद्धीस वाटतें. ती अशी कीं,- **सदाश्रितपदा**-एथें **सच्छब्दें**करून सच्चिदानंदरूप परब्रह्मांतर्गत सत्पदार्थवाचक जें या विश्वाचें मूल अधिष्ठान, तेणेंकरून आश्रित आहे पद म्हणजे अस्तित्वरूप स्थान ज्याचें, असें जें सद्रूप परब्रह्म तें; अथवा, **सत्** म्हणजे शुद्ध अस्तित्व तेणेंकरून- **आश्रित**-युक्त आहे- **पद**-सच्चिदानंदरूप पदत्रय-अर्थात् सच्चिदानंदरूप[2] परब्रह्म तें; अथवा **सत्** म्हणजे सत्पदेंकरून विलसित जें हें विश्व[3]

---

१ हरिहरादि या सृष्टीचे पालनोपसंहारादिकांचे कर्ते म्हणून मुख्य देव मानिलें आहेत, तेहि या परब्रह्माच्या अलीकडले तदंशेंकरून वर्णिले आहेतः—

ब्रह्माविष्णुमहेश्वरू । हेहि शिणती करितां सृष्टयादि व्यापारू ॥
मग सेविती विश्राममंदिरू । परब्रह्म तें ॥ १५ ॥
झाला जरी सर्वेश्वरू । धरिला जरी जाणिवेचा अहंकारू ॥
तरी तोहि नेणे पारू । त्या स्वरूपाचा ॥ १७ ॥
वि. सिं. पू. प्र. २

२ सत्शब्दें बालिजे अस्तित्वता । कालत्रयीं अबाधिता ॥
मायादेवीसीं तत्त्वता । तें अघटमान ॥ १३ ॥
वि. सिं., उ. प्र. ६

सत् म्हणिजे शाश्वत । तेंचि ज्ञानपण म्हणूनि चित् ॥
तेंचि स्वरूप यालागीं म्हणिजेत । आनंद ऐसें ॥ ६ ॥
ऐकें प्रकारांतरें निरूपण । अस्तिभातिप्रियपण ॥
हें पदत्रय मिळून । एकलें ब्रह्म ॥ ७ ॥
अस्ति म्हणिजे आहे । भाति म्हणिजे प्रकाशरूप होय ॥
आणि आपण प्रिय । अद्वयत्वें ॥ ८ ॥
यदस्तितद्भाति । ऐशी असे वेदश्रुती ॥
जें आहे तेंचि प्रकाशरूप म्हणति । तेंचि प्रिय ॥ ९ ॥
वि. सिं. उ. प्र. १०

३ जगदिदमीश्वरलीलाविलसितमितिश्रुतेः ।
ज्याच्या सत्पदीं विश्व असे । ज्याच्या चित्पदीं विश्व दिसे ॥
आनंदपदीं विश्व उल्लसे । तो तूं श्रीगुरुसच्चिदानंद ॥
—निगमसार वामनकृत

त्याणें-आश्रित म्हणजे आधृत, आहे-पद म्हणजे अधिष्ठान ज्याचें-तें, अर्थात् या सर्व विश्वाचें अधिष्ठानरूप जें परब्रह्म तें; त्याचें संबोधन. सदाशिवमनोविनोदा-स्पदा-सदाशिव जो महायोगी, त्याचा-मनोविनोद म्हणजे महायोग-निर्विकल्प-समाधिरूप त्याचें-आस्पद-गुरुरूपस्थान-अंतःप्रकाशक[२]; अथवा, सदा-निरंतर शिव-कल्याण-परमानंदरूप तोच अथवा तदात्मक जो-मनोविनोद-मनो-विलास तेंच आहे-आस्पद-स्थान ज्याचें-तें, अर्थात् आनंदरूप परब्रह्म; अथवा, सदा-निरंतर, शिव-कल्याण-कैवल्यरूप तत्पूर्वक जो-मनोविनोद-मनाचा विनोद-मनाचें अवस्थांतर भवन-अर्थात् मनाचें उन्मीलन-उन्मन्यवस्था त्याचें-आस्पद-अधिष्ठान, अर्थात् जेथें मनाचें उन्मीलन होतें तें कैवल्यस्थान; अथवा,

---

१ योग हा प्रथम शिवापासून उत्पन्न झाला म्हणून पुराणप्रसिद्ध इतिहास आहे:—

म्हणूनि शिवादि गुरुपर्यंत । जाणावे जे अवधूत ॥
ते मूर्त ना अमूर्तवत । परब्रह्म ॥ ३२ ॥

वि. सिं., उ. प्र. ११

२ गुरुर्ब्रह्मागुरुर्विष्णुर्गुरुदेवोमहेश्वरः ।
गुरुरेकः परब्रह्मतस्मैश्रीगुरवेनमः ॥

मुकुंदराज सद्गुरूच्या वर्णनांत म्हणतात:—

ऐसी प्रतिज्ञा करूनी । शिष्यासन्मुख बैसुनी ॥
आज्ञा समावेश करूनी । गुरुसंप्रदायक्रमें ॥ ९७ ॥

तेथ ज्ञानशक्तीचा प्रकाश । अज्ञानशक्तीचा निरास ॥
बोध उठला स्वयंप्रकाश । शिष्यचैतन्यीं ॥ ९८ ॥

शिवरामस्वामीनें एका पदांत म्हटलें आहे:—

गपकर अंधार होता तेथे खपकर उजेडलें नयनिं दाखवीलें ॥
चंद्रसूर्य नसतां तेथे तेज प्रकाशलें गुंग मला केलें ॥ धृ० ॥

या गुरुदत्तप्रकाशाविषयीं मध्वनाथ म्हणतात:—

अद्वैत केलें गुरुन दाविली हिऱ्याची खाण ॥
प्रकाश केला गहन संसार आतां कांहीं बोलणें तंव उरलें नाहीं
मी वेडी ग झालें बाई माणुसपण उरलें नाहीं ॥ धृ० ॥

मानपुरी प्रभु म्हणतात:—

नजर न आवे आतमजोती ॥ धृ० ॥
तेल न बाती बुझनही जाती नही दिवस नही राती ॥ १ ॥
जोती प्रकाशे दशदिशा झमके जैसा निरमल मोती ॥ २ ॥

सदा-निरंतर शिव-रुद्र-येणेंकरून उपलक्षित जो काल, त्याचा-मनोविनोद-गुणसाम्याच्या ठायीं जें आद्यस्फुरण[1]-अर्थात् तेणेंकरून महदादिप्रपंचहेतुक मूल-तत्त्वांची आविर्भूति-अर्थात् सर्वजगदाविर्भूति त्या सर्वांस-आस्पद-मूलाधिष्ठान-सच्चिदात्मक परब्रह्म, त्याचें संबोधन. स्वदासवशमानसा-स्वदास-आपले दास-निरंतर शुद्धांतःकरणानें आणि भक्तिप्रेमरसानें आपलें सेवन करणारे जे भक्तराज नारदादि त्यांसच-वश-मोक्षपद देण्याकरितां प्रसन्न आहे-मानस-अंतःकरण-चिद्वृत्ति ज्याची-असा[2], त्याचें संबोधन. कलिमलांतका-कलि-

---

१ भगवान् कपिलानें देवहूतीस तत्त्वनिर्णय सांगितला आहे. त्यांतहि सांख्य-मताप्रमाणें गुणसाम्यरूपा* जी मूलप्रकृति तीतें क्षुब्ध करणारा कालात्मक भगवान् म्हणून वर्णिला आहे:—

प्रकृतेर्गुणसाम्यस्य निर्विशेषस्यमानवि ।
चेष्टायतःसभगवान् कालइत्युपलक्षितः ॥ १७ ॥

अंतःपुरुषरूपेण कालरूपेणयोबहिः ।
समन्वेत्येषसत्वानां भगवानात्ममायया ॥ १८ ॥

भाग. स्कं. ३, अ. २६

२ येणेंकरून अनन्यभक्तीनेंच ब्रह्मप्राप्ति असा येथें कवीनें सर्वमतसिद्धांत सुचविला आहे असें समजावें.

श्वेताश्वतर उपनिषदांतहि एतत्सिद्धांतपूर्वकच मंगलाचरण केलें आहे:—

योब्रह्माणंविदधातिपूर्वंयोवैवेदांश्चप्रहिणोतितस्मै ।
तंहदेवमात्मबुद्धिप्रकाशंमुमुक्षुर्वैशरणमहंप्रपद्ये ॥

भगवान् कृष्णानेंहि गीतेंत हेंच सांगितलें आहे:—

मां च योऽव्यभिचारेण भक्तियोगेन सेवते ।
स गुणान्समतीत्यैतान् ब्रह्मभूयाय कल्पते ॥

भ. गी. अ. १४, श्लो. २६

ये भजन्ति तु मां भक्त्या मयि ते तेषु चाप्यहम् ।

भ. गी. अ. ९, श्लो. २९

आणखी हीच भगवद्भक्ति मुख्य पुरुषार्थ म्हणोन भक्तजन तीच वारंवार प्रार्थितात:—

---

* सत्वरजस्तमसांसाम्यावस्थाप्रकृतिः—असें सांख्यसूत्र आहे.

कलियुग तत्संबंधीं जो-मल-अज्ञानरूप-मायाऽविद्यात्मक त्याचा-अंतक-नाश

नाथयोनिसहस्रेषुयेषुयेषुव्रजाम्यहम् ।
तेषुतेष्वचलाभक्तिरच्युतास्तुसदात्वयि ॥

विष्णुपु.

भक्त तोच महायोगी म्हणून गीतेंत सांगितलें आहे;

योगिनामपि सर्वेषां मद्गतेनांतरात्मना ।
श्रद्धावान्भजते यो मां स मे युक्ततमो मतः ॥

भ. गी., अ. ६, श्लो. ४७

ज्ञानदेव म्हणतात;—

भावेंवीण भक्ती भक्तीवीण मुक्ती । बळेंवीण शक्ती बोलों नये ॥
कैसेनि दैवत प्रसन्न त्वरीत । उगा राहे निवांत शिणशी वायां ॥
सायासें करीसी प्रपंच दिननिशीं । हरीशीं न भजसी कवण्यागुणें ।
ज्ञानदेव म्हणे हरिनाम जपणें । तुटती बंधनें प्रपंचाचीं ॥
तीर्थव्रतनेम भावेंवीण सिद्धि । वायांची उपाधी करीशिल ॥
भावबळें आकळे येरव्हवीं नाकळे । करतळीं आंवळे तैसा हरी ॥
पारदाचा रवा घेतां भुमीवरी । यत्न परोपरी तैसीं साधनें ॥
ज्ञानदेव म्हणे निवृत्ति निर्गुण । दिधलें संपूर्ण माझे हातीं ॥

तुकारामानेंहि ज्ञानापेक्षां भक्तीचें माहात्म्य अधिक म्हणोन वर्णिलें आहे;—

जाणें भक्तिचा जिव्हाळा । तोचि दैवाचा पूतळा ॥
नायकावे कानीं तयाचे ते बोल । भक्तीवीण खोल ज्ञान सांगे ॥
वाखाणी अद्वैत भक्तीभावेंवीण । दुःखपावेशीण श्रोतावक्ता ॥
अहंब्रह्म म्हणूनी पाळीतमे पिंडा । बोलों नये भांडा तयासवें ॥
दंबाद्यलंड बोले जो पाखंड । त्याचें काळें तोंड संतांमध्यें ॥
तुका म्हणे खंडी देवभक्तपण । वरिष्ठत्याहोन श्वपचतो ॥
भक्तीचें हें सुख भक्तचि जाणती । दुर्लभयागती आणी काशी ॥
अभेदूनि भेद राखियेला अंगीं । वाढावया जगीं प्रेमसुख ॥
जाणोनी नेणते जाले तयासुखें । न बोलोनि मुखें बोलताती ॥
टाळघोळ कथा प्रेमाचा सुकाळ । मूढलोकपाळ तरावया ॥
तुका म्हणे आहे तयाशींच ठावें । जिहीं एकभावें साधियेलें ॥

समूल नष्ट करणारा जो ब्रह्मसाक्षात्कार तद्रूप, त्याचें संबोधन. कामदा-काम-मुमुक्षुता-मोक्षप्राप्तीच्छा, तीतें देणारा-मोक्षप्रद-अंतर्ज्ञानप्रकाशक-ब्रह्मानंद देणारा, त्याचें संबोधन. वदान्यजनसद्गुरो-वदान्य-उदारांतःकरण असा जो-जन-लोक-महात्मा-आस्तंभब्रह्मांडव्यापकेश्वरमहत्त्वातें आत्मज्ञानेंकरून अनुभवून महा-त्मता ज्यांस प्राप्त झाली आहे असे[3] त्यांचा-सद्गुरु-ती महात्मता देण्यास परम समर्थ, त्याचें संबोधन. प्रशमिताभितासन्मदा-प्रशमित-अत्यंततेनें शमविलें आहे-अर्थात् नष्ट केलें आहे, अमित-अपार, असन्मद-मिथ्यामदअहंकारजन्य-प्रपंचमिथ्याज्ञान-मूलाऽविद्यात्मक-ज्याणें; त्याचें संबोधन. गदारिदरनंद-कांबुजधरा-गदा-अहंकृतिजन्यप्रपंचमिथ्याज्ञानसद्बुद्धीतें जागृत करणारी जी भगवच्चिच्छक्ति तिचें उपलक्षण, अरि-चक्र-सत्‌ज्ञानरूप जो अंतःप्रकाश

---

वृक्ष नेदी फळ । काय करी वसंत काळ ॥
तुका म्हणे भक्तीवीण । फळ नाहीं नाहीं जाण ॥

या आपल्या कवींनें आणखी एके ठिकाणीं भक्तीचें वर्णन एका आर्येंत असें केलें आहे कीं;—

भक्तिविना वश नोहे । वीण्यानें वा मृदंगनादानें ॥
कन्यादानफलातें । पावति कीं ते मृदंगनादानें ॥

१ गीतेंत म्हटलें आहे

दैवी ह्येषा गुणमयी मम माया दुरत्यया ।
मामेव ये प्रपद्यन्ते मायामेतां तरन्ति ते ॥
भ. गी. अ. ७, श्लो. १४

श्वेताश्वतर उपनिषदांत म्हटलें आहे;—

मायांतुप्रकृतिंविद्यान्मायिनंतुमहेश्वरम् ।

२ भक्तिमीमांसेंत भगवंताच्या मोक्षप्रदत्वरूप गुणांचें लक्षण केलें आहे तें असें;—
भगवानेवात्ममक्तेस्त्रिगुणात्मकांतःकरणलयपूर्वंकब्रह्मानंदावाप्तिलक्षणमुक्तिहेतुः

३ अशा माहात्म्यांचें लक्षण आचार्यांनीं मनीषापंचकांत सांगितलें आहे;—

जागृत्स्वप्नसुषुप्तिषुस्फुटतरायासंविदुज्जृंभते ।
याब्रह्मादिपिपीलिकान्ततनुषुप्रोताजगत्साक्षिणी ॥
सैवाहंनतुदृश्यवस्त्वितिदृढप्रज्ञापियस्यास्तिचेत् ।
चांडालोपिसतुद्विजोऽस्तुगुरुरित्येषामनीषामम ॥

तुकोबाहि म्हणतात;

अणुरेणुथोडका । तुका आकाशाएवढा ॥

त्याचें उपलक्षण, दर-शंख-नादमूलक जो प्रणव-ओंकार, त्याचें प्रतिरूप
नंदक-विष्णूचें खड्ग-अज्ञानरूप अथवा संशयरूप जी हृदयग्रंथि तिचें छेदक
आत्मज्ञानें त्याचें प्रतिरूपक, अंबुज-कमळ-संसारदुःखेंकरून पीडित जो

१ विष्णुसहस्रनामभाष्यांत म्हटलें आहे;—

मनस्तत्त्वात्मकंचक्रंबुद्धितत्त्वात्मिकांगदां ।
जगद्रक्षार्थधरतीतिशंखचक्रगदाधरः ॥

२ ओंकार हा मूलनादब्रह्मात्मक शब्द केवळ ब्रह्मस्वरूपवाचक होय, म्ह
श्रुतिस्मृतींत याचें गौरव वर्णिलें आहे;—

**ओमित्येकाक्षरंब्रह्म**—अशी श्रुति आहे.

वायुपुराणांत सर्व मंत्रांत हा शब्द नायक होय, म्हणून शिवानें भवानीस सां
तलें आहे;—

ओंकारःप्रणवोब्रह्मसर्वमंत्रेषुनायकः ।
आदौसर्वत्रयुंजीतमंत्राणांचशुभानने ॥

गीतेतहि कृष्णानें अर्जुनास या शब्दाचें माहात्म्य सांगितलें आहे;—

ॐइत्येकाक्षरं ब्रह्म व्याहरन्मामनुस्मरन् ।
यः प्रयाति त्यजन्देहं स याति परमां गतिम् ॥
भ. गी. अ. ८, श्लो. १३

यावर ज्ञानेश्वर म्हणतात;

तैसें ओंहें स्मरों सरे । आणि तेथेंचि प्राणपुरे ॥
मग प्रणवातीत उरे । पूर्णघनजें ॥ १७ ॥
म्हणोनि प्रणवैक नाम । हें एकाक्षरब्रह्म ॥
जो माझें स्वरूपपरम । स्मरतसाता ॥ १८ ॥

विवेकसिंधूच्या पूर्वार्धांतील सहाव्या प्रकरणांत या प्रणवाचें स्वरूप, व त्याच
अवयवाचें वर्णन, विस्तारपूर्वक आणि अत्यंत गांभीर्यानें मुकुंदराजानें केलें आहे, ते
असल्यास पाहावें.

३ भिद्यतेहृदयग्रंथिश्छिद्यंतेसर्वसंशयाः ।
क्षीयंतेचास्यकर्माणितस्मिन्दृष्टेपरावरे * ॥
—इतिश्रुतिः

* ही श्रुति श्लोकरूपानें भागवतांतहि कांहीं पाठभेदेंकरून आढळते.

त्याच्या म्लान आणि आकुंचित अंतःकरणाचें भगवद्भक्तिजन्यप्रेमानंदानें जें विकासन, त्याचें निदर्शन; या सर्व चिन्हांतें धारण करणारा, अर्थात् या सर्व उपलक्षणांनीं उपलक्षित परब्रह्मरूप जो भगवान् त्याचें संबोधन. असा सच्चिदानंदरूप जो तूं त्या-ते सदा नमः-ते-तुला, सदा निरंतर-अव्यवहितभक्तिप्रेमपुरःसर, नमः-नमस्कार-एकाग्रचित्तेंकरून अंतःकरणाची अत्यंत लीनता असो.

आत्मारामाश्चमुनयोनिर्ग्रंथाअप्युरुक्रमे ।
कुर्वंत्यहैतुकीं भक्तिमित्थंभूतगुणोहरिः ॥

भाग. स्कं. १, अ. ७, श्लोक १०

१ याप्रमाणें भगवद्भक्तीनें मनाची प्रसन्नता भागवतांत सांगितली आहे;—

अतोवैकवयोनित्यंभक्तिंपरमयामुदा
वासुदेवेभगवतिकुर्वंत्यात्मप्रसादनीं

भाग. स्कं १, अ. २, श्लोक. २२.

एवंप्रसन्नमनसोभगवद्भक्तियोगतः ।
भगवत्तत्त्वविज्ञानंमुक्तसंगस्यजायते ॥

भाग. स्कं. १, अ. २, श्लोक २१

पदाब्जरजजेंतुझेंसकलपावनाधारतें ।
अघाचळहितारिलेबहुतुवांचिराधारतें ॥
अजामिळअघासुरव्रजवधूबकीपिंगळा ।
अशांगतिदिलीउरेनतृणभेटतांविंगळा ॥ २ ॥

पहिल्या केकेंत कवीनीं प्रथमतः भगवंताच्या चरणकमलाचें ध्यान क... स्तुतीस आरंभ केला, म्हणून आतां त्याच चरणकमलाचें माहात्म्य वर्णित होत्या... कवि पुढल्या दोन केकांस आरंभ करितात. याप्रमाणें आपलें अतिदैन्य, अत्य... अत्यंत नम्रीभाव, अथवा तद्भावपूर्वक विज्ञप्ति, प्रकट कर्तव्य असतां थोरांसमो... साक्षात् अभिवाद न करितां त्यांच्या चरणस्पर्शनाची अथवा चरणाप्रत स्वमनोगता... निवेदन करण्याची जनरूढि आहे. कारण तसा साक्षात् अभिवाद केल्यानें अभिवाद्... काचें किंचित् औद्धत्य इंगित होतें. आपल्या चरणाजवळ माझी हीच विनंती आहे... अशा प्रकारें नम्रतापूर्वक बोलण्याचा लोकव्यवहार प्रसिद्ध आहे. यास्तव कवि य... आणि पुढल्या केकेंत भगवंताच्या चरणाचा स्तव करित होत्साते म्हणतात.

**पदान्वयः**—तुझें जें पदाब्जरज तें सकलपावनाधार, राधारतें तुवांचि व... अघाचळहि तारिले, अजामिळ, अघासुर, व्रजवधू, बकी, पिंगळा, अशां गति दिली... विंगळा भेटतां तृण न डरे.

मागल्या केकेंत आरंभींच 'सदाश्रितपदा' या संबोधनानें तें भगवच्चरणां... माहात्म्य सुचविलें, त्याचा उपन्यास करून कवि तेंच भगवच्चरणाचें माहात्म्य... वर्णन करण्यास आरंभ करितात. कवि भगवंतास म्हणतात,—तुझ्या पदाचें त... माहात्म्य थोर आहेच, परंतु तुझें जें पदाब्जरज तें सकलपावनाधार—तुझें... पदाब्जरज—चरणकमलसंबंधी रज—धुलि[1] तें सकलपावनाधार—सकलांस पावन... पावन करणारीं—पवित्र करणारीं—लोकप्रसिद्ध गंगादि पवित्र तीर्थें—अथवा व्र... दानादि पवित्र कर्में, त्यांस—आधार—आधारभूत होय. गंगा विष्णुपद... पासून निर्माण झाली आहे म्हणून, अर्थात् तुझ्या चरणरजाचा आश्रय तिनें के... आहे म्हणून, ती पावनकर्त्री; नाहीं तर तिच्याच अंगीं त्या आश्रयावांचून पाव... करण्याचें सामर्थ्य नाहीं. अतएव तुझी चरणधूलिच सकल पापी जनास प... करण्यास समर्थ होय; मग साक्षात् चरणमहिमा काय वर्णावा; असा एथें काव्या... पत्ति अलंकार जाणावा[2]. त्वां इतकें माझ्या चरणरजाचें माहात्म्य वर्णिलें, तर अ...

---

१ रज शब्द संस्कृतांत नपुंसक होय.

२ त्याचप्रमाणें शंकराचार्यांनीहि सौंदर्यलहरींत भगवतीच्या चरणकमलाच्या [illegible] माहात्म्य वर्णिलें आहे,—

## वर्गणीदारांकरितां

१ श्रीसाईलीलेचा वर्षारंभ चैत्र महिन्याचे अंकापासून आहे. नवीन वर्गणीदारांस वर्षारंभापासून अंक घ्यावे लागतील.

२ पत्ता बदलणें झाल्यास लगेच आम्हांस कळवावें. बदललेला पत्ता न कळविल्यामुळें कित्येक वेळां अंक गहाळ होतात.

३ अंकासंबंधीं पत्रव्यवहार आमचेकडे करावा.

४ लेखासंबंधीं पत्रव्यवहार संपादक व प्रकाशकांकडे करावा.

## वार्षिक वर्गणी.

वार्षिक वर्गणी टपाल खर्चासह मनिऑर्डरनें अगाऊ रु. ३।=, व्ही. पी. नें रु. ३॥, फुटकळ अंक ।= मागील अंकास शिल्लक असल्यास ॥·

व्यवस्थापक—**श्रीसाईलीला**

## लेखकांकरितां

१. श्रीसाईलीलेंत प्रसिद्धीसाठीं पाठविलेला लेख अथवा कविता कागदाच्या एका बाजूवर, मार्जिन सोडून, सुवाच्य बालबोध लिपींत असावी. पेन्सिलीनें किंवा कागदाचे दोन्हीं बाजूस लिहिलेला मजकूर छापण्यास फार त्रास पडतो.

२. लिखाणासोबत पूर्ण नांव व पत्ता दिला पाहिजे. नांव प्रसिद्ध करितां टोपण नांवाखालीं प्रसिद्धि द्यावयाची असल्यास त्याप्रमाणें कळवावें.

३. लेख अथवा कविता हातीं आल्यानंतर १ महिन्यांत पसंति अगर नापसंति कळविली जाईल. पसंति कळविल्यानंतर, आम्हांला कळल्याशिवाय लेखकांनीं तो मजकूर दुसरीकडे छापविण्यास देऊं नये.

४. लेखांत योग्य तो फेरफार करण्याचा अधिकार आमचेकडे राहील. येईल तसा शब्दशः प्रसिद्ध करण्याची हमी आम्हीं घेत नाहीं.

५. लेखासोबत पुरेसें पोस्टेज आल्यास, नापसंत लेख परत करूं.

प्रकाशक—**श्रीसाईलीला**

श्री साईलीला. Register No. B. 1728.


सर्व प्रकारचे मेंदूचे विकारांवर जाग्रण व मानसिक श्रम करणाऱ्यांस अत्यंत उपयोगी

नकलेबद्दल ] ब्राह्मी तेल [ सावध रहावें.

बाळबाळंतिणीकरितां औषधें

बाळंत काढा नं. १ पहिल्या दहा दिवसांचा ८१४; बाळंत काढा नं. २ दहा दिवसांनंतर ८१४; बाळकडू:-मूल जन्मल्यापासून देण्यास योग्य ८८; कुमारी आसव लहान मुलांकरितां ८१२.

सतत २५ वर्षें लोकादरास पात्र झालेलें, कोणत्याही ऋतूंत घेण्यास योग्य, अत्यंत मधुर व आरोग्यदायक

एक रत्तल १८१० / दीड रत्तल २८४ } द्राक्षासव { अर्धा रत्तल ८१४ / ट. ख. पॅ. नि.

शिवाय आमचे कारखान्यांत टिकाऊ तयार काढे, आसवें, अरिष्टें, भस्में वगैरे ५०० वर औषधें तयार आहेत. त्यांचे माहितीचा मोठा क्याटलाग व प्रकृतिमान भरून पाठविण्याकरितां "रुग्ण-पत्रिका" हीं सात आण्यांचीं तिकिटें आलीं असतां पाठवूं.

दत्तात्रय कृष्ण सांडू ब्रदर्स

आर्यौषधी कारखाना, चेंबूर जि. ठाणें.

टे. नं. ८७०२४ × २२२७८. दुकान दवाखाना ठाकुरद्वार मुंबई नं० २.


हें पुस्तक श्रीलक्ष्मीनारायण छापखाना, ३६४ ठाकुरद्वार, मुंबई येथें अनंत आत्माराम मोरमकर यांनीं छापून ब्रेड यांनीं ५ सेंट मार्टिन्स रोड, वांद्रें येथें प्रसिद्ध केलें.